सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १६१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २१ जुलै २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ऑपरेशन सिंदूरवरून पहिल्याच दिवशी संसदेत गोंधळ, कामकाज स्थगित

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नवी दिल्ली**

ऑपरेशन सिंदूरवरून पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेत विरोधकांनी प्रचंड गोंधळ घातला.यामुळे सभागृहांचे कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले होते. लोकसभा आणि राज्यसभेत विरोधकांनी पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडण्यात अद्याप यश का आलेले नाही, असा सवाल केला. तसेच ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी केली. तसेच ट्रम्प यांनी आपणच भारत-पाकिस्तान युद्ध थांबविल्याचा दावा केल्यावरून देखील गोंधळ झाला.



राज्यसभेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी मोदी सरकारवर टीका सुरु केली आहे. विरोधकांनी यानंतर जोरदार घोषणाबाजी केली. पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी अद्याप पकडले गेलेले नाहीत. त्यांना मारलेही गेलेले नाही. जम्मू आणि काश्मीरमध्ये गुप्तचर यंत्रणेचे अपयश आल्याचे उपराज्यपालांनी म्हटले आहे. ट्रम्प यांनी २४ वेळा सांगितले आहे की आम्ही युद्ध थांबवले. हे देशासाठी अपमानजनक आहे. सरकारने या सर्व प्रश्नांची उत्तरे दिली पाहिजेत, अशी मागणी खर्गे यांनी केली.

ऑपरेशन सिंदूर, भारत-पाकिस्तान युद्धबंदी, युद्धबंदीवरील डोनाल्ड ट्रम्पचे दावे आणि बिहार मतदार यादी यासारख्या मुद्द्यांवर लोकसभेत घेरण्याची रणनिती तयार करण्यात आली आहे. यानुसार आज पहिल्याच दिवशी पहलगाम हल्ला आणि ट्रम्प यांचा दावा उचलण्यात आला आहे. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी आधीच प्रश्नोत्तराच्या तासानंतर आपण ऑपरेशन सिंदूरवर चर्चा करू असे स्पष्ट केले होते. यानंतर विरोधकांनी ही मागणी सुरु केली.

लोकसभेची कामकाज सल्लागार समिती दुपारी २.३० वाजता बैठक घेईल. विरोधकांनी त्यांना ज्या मुद्द्यांवर चर्चा करायची आहे ते मांडावे. सरकार चर्चेसाठी तयार आहे. सभागृहात गोंधळ घालणे योग्य नाही, असे संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी म्हटले आहे.

## मुंबई विमानतळावर मोठा अपघात टळला

## विमान धावपट्टीवरून घसरले

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

सोमवारी सकाळी मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर एक भीषण अपघात टळला. मुसळधार पावसात कोचीहून येणारे एअर इंडियाचे विमान मुंबईविमानतळावर धावपट्टीवरून घसरले. तपासणीसाठी विमान ग्राउंड करण्यात आले. विमान सुरक्षितपणे उतरवण्यात आले असून सर्व प्रवासी आणि क्रू मेंबर्स सुखरुप असल्याचे विमान कंपनीच्या प्रवक्त्याने सांगितले. मात्र या अपघाताचे फोटो समोर आले असून विमानाचे तिन्ही टायर फुटल्याचे म्हटलं जात आहे.



मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर सोमवारी सकाळी मुसळधार पावसामुळे कोचीहून येणारे एअर इंडियाचे विमान -ख२७४४ धावपट्टीवरून घसरले. एअरबस -३२० विमान धावपट्टी २७ वरून घसरले आणि नंतर टॅक्सीवेवर थांबले. विमानाला किरकोळ नुकसान झालं असलं तरी ते पूर्णपणे कार्यरत होते आणि पार्किंग बेमध्ये सुरक्षितपणे नेण्यात आले. नुकसानीमुळे रनवे २७ काही काळासाठी बंद ठेवण्यात आला. मुंबई विमानतळाच्या धावपट्टी ०९/२७ ला नुकसान झाले आहे, त्यामुळे धावपट्टी १४/३२ ऑपरेशनसाठी सक्रिय करण्यात आल्याचे विमानतळाच्या प्रवक्त्यांकडून सांगण्यात आलं.

लँडिंग दरम्यान विमान धावपट्टीवरून १६ ते १७ मीटर दूर गेले होते. मात्र त्यानंतर ते सुरक्षितपणे टॅक्सीवेवर थांबले. सकाळी ९:२७ वाजता विमान कोचीहून मुंबईला येत असताना ही घटना घडली. या बिघाडामुळे विमानाचे तीन टायर फुटले. या घटनेनंतर आपत्कालीन प्रतिसाद पथक घटनास्थळी पोहोचले. या घटनेत कोणताही प्रवासी किंवा कर्मचारी जखमी झाला नसल्याचे सांगण्यात आलं आहे. दुसरीकडे, प्रवाशांना झालेल्या गैरसोयीबद्दल विमानतळ आणि एअर इंडियाने माफी मागितली आहे.

मुसळधार पावसामुळे, लँडिंग दरम्यान धावपट्टीवरुन पुढे गेले, पण विमान सुरक्षितपणे गेटवेवर पोहोचले आणि सर्व प्रवासी सुरक्षितपणे उतरले. विमानाला चौकशीसाठी ग्राउंड करण्यात आले आहे. प्रवाशांची आणि कर्मचाऱ्यांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. डीजीसीएचे तपास पथक मुंबई विमानतळावर उपस्थित आहे आणि या प्रकरणाची सखोल चौकशी करत आहे, असं एअर इंडियाच्या प्रवक्त्यांकडून सांगण्यात आलं आहे.

## माझा हक्क आहे, पण विरोधी पक्षनेता असूनही संसेदत बोलू दिले जात नाही; राहुल गांधींचा आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नवी दिल्ली**

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू झाले आहे. ऑपरेशन सिंदूरवरून पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी संसदेत विरोधकांनी गोंधळ करण्यास सुरुवात केली. लोकसभा आणि राज्यसभा या दोन्ही सभागृहांमध्ये विरोधकांनी पहलगाम हल्ल्यातील दहशतवाद्यांना पकडण्यात अद्याप का यश आलेले नाही, असा विचारणा केली. तसेच ऑपरेशन सिंदूरवर चर्चेची मागणी केली. ट्रम्प यांनी आपणच भारत-पाकिस्तान युद्ध थांबविल्याचा दावा केल्यावरूनही सभागृहात गोंधळ झाल्याचे पाहायला मिळाले. यातच संसदेत बोलू दिले जात नसल्याचा आरोप विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केला आहे.



पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी म्हणाले की, सभागृहात संरक्षण मंत्र्यांना बोलू दिले जात आहे. त्यांच्या लोकांना बोलायला दिले जाते. परंतु, विरोधक काही बोलू इच्छित असतील, तर त्यांना परवानगी नाकारली जाते. मी विरोधी पक्षनेता आहे. माझा हक्क आहे. मला कधी बोलू दिले जात नाही. हा नवा दृष्टिकोन आहे. सरकारने परवानगी दिल्यास चर्चा केली जाईल. परंतु, मुद्दा असा आहे की, सरकारच्या बाजूने असलेल्या सदस्यांना बोलले दिले जात असेल, तर आम्हा विरोधकांनाही बोलण्याची संधी दिली गेली पाहिजे. आम्ही दोन शब्द बोलण्याची विनंती केली तरी विरोधकांना बोलू दिले जात नाही, असा आरोप राहुल गांधी यांनी केला. राहुल गांधी संसद परिसरात पत्रकारांशी बोलत होते.

**ऑपरेशन सिंदूरबाबत सरकारने निवेदन करावे**

काँग्रेस नेत्या प्रियंका गांधी यांनी बंधू राहुल गांधी यांचे समर्थन केले आहे. विरोधकांना बोलण्याची संधी दिली पाहिजे. सरकारने ऑपरेशन सिंदूरचा मुद्दा टाळण्याऐवजी त्यावर निवेदन करायला हवे, चर्चा करायला हवी, असे प्रियंका गांधी यांनी म्हटले आहे. लोकसभेचे कामकाज सुरू होताच विरोधी बाकावरील सदस्यांनी गोंधळ करायला सुरुवात केली. या गोंधळामुळे लोकसभेचे कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते. तर राज्यसभेतही काँग्रेस सदस्य मल्लिकार्जुन खरगे यांनी ऑपरेशन सिंदूरवरून सरकारवर टीका केली. याला भाजपा सदस्य जेपी नड्डा यांनी उत्तर दिले. विरोधकांच्या गोंधळामुळे राज्यसभेचे कामकाज सुरुवातीला १२ वाजेपर्यंत स्थगित करण्यात आले होते.

दरम्यान, ऑपरेशन सिंदूर दरम्यान जगाने भारतीय सैन्याची ताकद पाहिली. ऑपरेशन सिंदूर अंतर्गत २२ मिनिटांत दहशतवाद्यांच्या ठिकाणांना लक्ष्य करण्यात आले आणि ती ठिकाणे जमीनदोस्त करण्यात आली. मेड इन इंडिया लष्करी शक्तीच्या या नवीन स्वरूपाकडे जग खूप आकर्षित झाले आहे. जेव्हा मी जगातील लोकांना भेटतो तेव्हा भारताने बनवलेल्या मेड इन इंडिया शस्त्रांबद्दल जगाचे आकर्षण वाढत आहे, असेच दिसते, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संसदेचे अधिवेशन सुरू होताना सांगितले.

## मुंबई लोकल साखळी बॉम्बस्फोटातील १२ दोषींची निर्दोष मुक्तता, राज्य सरकारला दणका

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

मुंबईला हादरवून टाकणाऱ्या ११ जुलै २००६ च्या साखळी बॉम्बस्फोटातील १२ दोषींची आज मुंबईउच्च न्यायालयाने निर्दोष मुक्तता केली आहे. दोषींपैकी ५ जणांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. या पाच जणांनी फाशीच्या शिक्षेला उच्च न्यायालयात आव्हान दिलं होतं. उच्च न्यायालयाने त्यांचा अपील मान्य केला. फाशीची शिक्षा रद्द करू नये अशी मागणी राज्य सरकारकडून करण्यात आली होती. पण न्यायालयने दिलेल्या निर्णयामुळे राज्य सरकारला दणका बसला आहे.



१२ दोषींपैकी एकाचा आधीच मृत्यू झाला आहे. तर ११ जणांचा आता तुरुंगाबाहेर येण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. १९ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर दोषींची निर्दोष मुक्तता झाली आहे. गेली १९ वर्ष यातील दोषी एकही दिवस तुरुंगाबाहेर आले नव्हते.

न्यायमूर्ती अनिल किलोर आणि श्याम चांडक यांच्या खंडपीठासमोर मुंबई उच्च न्यायालयात आज सुनावणी पार पडली. दोषींविरोधात केवळ शंकेपलिकडे कोणतेही सबळ पुरावे तपास यंत्रणा सादर करू शकली नाही, असं निरीक्षण न्यायमूर्तींनी नोंदवलं आहे.

न्यायालयाला जवळजवळ सर्वच सरकारी वकिलांचे जबाब अपूर्ण वाटले. न्यायालयाच्या मते, स्फोटाच्या जवळजवळ १०० दिवसांनंतर टॅक्सी चालकांना किंवा ट्रेनमधील लोकांना आरोपींची आठवण येण्याचं कोणतंही कारण नव्हतं. याशिवाय, बॉम्ब, बंदुका, नकाशे इत्यादी पुरावे जप्त करण्याबाबत न्यायालयानं म्हटलं की, ही जप्ती खटल्यासाठी महत्त्वाची ठरत नाही कारण स्फोटांसाठी वापरण्यात आलेल्या बॉम्बचा प्रकार ओळखण्यात सरकारी वकिलांना अपयश आलं आहे.

**कुणाकुणाची झाली निर्दोष मुक्तता?**

कमाल अन्सारी, मोहम्मद फैसल, अतौर रहमान शेख, एहतेशाम कुतुबुद्दीन सिद्दीकी, नवीद हुसेन खान आणि आसिफ खान या सर्वांना बॉम्ब ठेवल्याबद्दल दोषी ठरवण्यात आलं होतं. या पाचही जणांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली होती. यातील कमाल अन्सारीचा कोरोनाची लागण झाल्यामुळे नागपूर कारागृहात मृत्यू झाला होता. आता उर्वरित चार जण निर्दोष ठरवण्यात आले आहेत.

जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आलेल्या सात आरोपींमध्ये तनवीर अहमद अन्सारी, मोहम्मद माजिद शफी, शेख मोहम्मद अली आलम, मोहम्मद साजिद मार्गुब अन्सारी, मुझम्मिल अतौर रहमान शेख, सुहेल मेहमूद शेख आणि जमीर अहमद लतीफुर रहमान शेख यांचा समावेश आहे. या सातही जणांना न्यायालयाने निर्दोष ठरवले आहे.

**मुंबईच्या इतिहासातील काळा दिवस**

मुंबईत ११ जुलै २००६ रोजी संध्याकाळी साडेसहा वाजताच्या सुमारास लोकलमध्ये एकूण ७ ठिकाणी बॉम्बस्फोट झाले होते. माटुंगा, माहीम, बांद्रा, जोगेश्वरी, बोरीवली, कांदिवली, मीरारोड या रेल्वे स्थानकांदरम्यान स्फोट झाले होते. यात २०९ हून अधिक जणांचा मृत्यू झाला होता. तर ७०० पेक्षा अधिक जण जखमी झाले होते. मुंबई लोकलमध्ये संध्याकाळच्या वेळी गर्दी असते. त्यामुळे जास्तीत जास्त जीवितहानी होईल अशा उद्देशानंच हे बॉम्बस्फोट घडवण्यात आले होते. तपासानंतर हे स्फोट लष्कर-ए-तैयबा आणि सिमी या दहशतवादी संघटनांनी घडवले, असा निष्कर्ष काढण्यात आला होता.



## आमदार रोहित पवार यांच्यावर गुन्हा दाखल पोलिसांवर अरेरावी केल्याच्या आरोप प्रकरणी कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१मुंबई**

राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार) आमदार रोहित पवार यांच्यावर पोलिसांवर ओरडल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आमदार रोहित पवार यांच्याविरोधात मुंबईतील आझाद मैदान पोलीस ठाण्यात सरकारी कामात अडथळा आणणे, पोलीस अधिकाऱ्याशी गैरवर्तन केल्याबद्दल गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आझाद मैदान पोलिसांनी तशी फिर्यादच घेतली आहे. हा गुन्हा नोंद होण्यामागे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक आणि आमदार नितीन देशमुख यांच्या अटकेची पार्श्वभूमी आहे. दोन दिवसांपूर्वी विधिमंडळाच्या लॉबीत भाजपा आमदार गोपीचंद पडळकर आणि जितेंद्र आव्हाड यांच्या कार्यकर्त्यांमध्ये हाणामारी झाली होती. त्यानंतर पोलिसांनी जितेंद्र आव्हाड यांचे कार्यकर्ते नितीन देशमुख यांना ताब्यात घेतलं होतं. नितीन देशमुख यांच्या अटकेविरोधात रोहित पवार हे थेट पोलीस ठाण्यात गेले होते आणि तिथे त्यांनी पोलिस अधिकाऱ्यांशी वाद घातला. आता या प्रकरणी रोहित पवारांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## तिवसा नजीक दुचाकी अपघात दोन ठार, दोन लहान मुले गंभीर जखमी

**विदर्भ प्रजासत्ताक दि. २१ तिवसा**

नागपूर येथे ताजुद्दीन बाबांच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या दुचाकी वाहनाला तिवसा तालुक्यातील भारवाडीजवळ भीषण अपघात झाला. या अपघातात दोन जणांचा जागीच मृत्यू झाला असून, दोन लहान मुले गंभीर जखमी झाली आहेत.




प्राथमिक माहितीनुसार, जालना जिल्ह्यातील भोकरदन येथील दोन पुरुष दोन मुलांसह ताजुद्दीन बाबांच्या दर्शनासाठी नागपूरला निघाले होते. प्रवासादरम्यान झोपेची डुलकी आल्यामुळे दुचाकी थेट रस्त्याच्या दुभाजकावर आदळली. अपघात इतका भीषण होता की, एका मृत व्यक्तीचा हात तुटून घटनास्थळीच पडला होता.

अपघातात दोन जणांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाला असून, जखमी मुलांवर डॉ. सावदेकर यांच्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिसांनी घटनेचा पंचनामा करून पुढील तपास सुरू केला आहे.

सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
जाहिरात आणि
बातम्यांसाठी संपर्क
करा ८६०५५४८८५३

## केंद्रीय मंत्री नितीन गडकरी पोहोचले बाबा ताजुद्दीन यांच्या दर्ग्यात

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१नागपूर**

सूफी संत बाबा ताजुद्दीन यांचा वार्षिक ऊर्स ताजाबाद शरीफ येथे मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. यानिमित्त हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट कार्यालयातून दरबारी शाही संदल मंगळवारी काढण्यात येणार आहे. संदल ताजाबादच्या बुलंदद्वार येथून निघाल्यानंतर उमरेड रोड, शीतला माता मंदिर, सक्करदरा चौक, अशोक चौकपासून महाल, इतवारी, गांधीबागच्या ज्या मार्गावरुन बाबा ताजुद्दीन आपल्या जीवनकाळात फिरले त्या मार्गाने फिरविण्यात येईल.



केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी संत हजरत बाबा ताजुद्दीन यांच्या १०३ व्या उर्सनिमित्त आयोजित उत्सवाला मोठा ताजबाग येथे रविवारी रात्री उशिरा भेट दिली. 'संत ताजुद्दीन बाबा यांचा आशीर्वाद घेण्यासाठी नागपुरात येतात. या परिसराचे सौंदर्यीकरण झाले, मात्र आता गोरगरीब रुग्णांच्या उपचारासाठी एक मोठे हॉस्पिटल व्हावे अशी इच्छा आहे,' अशी भावना गडकरी यांनी व्यक्त केली.

हजरत बाबा ताजुद्दीन यांचा १०३ वा वार्षिक उरूस शुक्रवार १८ जुलैपासून सुरू झाला आहे. यानिमित्त ताजुद्दीन बाबांवर श्रद्धा असलेले लाखो भाविक नागपुरात आले आहे. ताजबाग येथून मंगळवारी (२२ जुलै) शाही संदल निघणार आहे. शाही संदल ज्या मार्गाने प्रस्थान करेल तो ताजबागचा रस्ता सक्करदरा चौक ते दिघोरी चौक वाहतुकीसाठी पूर्णपणे बंद केला जाणार आहे.मिरवणुकीत वाहतुकीची कोंडी होऊ नये म्हणून, या मार्गावरची सर्व प्रकारची वाहने पर्यायी मार्गावर वळवली जाणार आहेत. संदल मिरवणुकीदरम्यान तीनगल चौक ते शहीद चौक एकेरी वाहतूक करण्यात येणार आहे. या मार्गावर संदल मिरवणूक व दुचाकी वाहने सोडून इतर सर्व वाहनांना प्रवेश बंद राहील. बंद केलेल्या मार्गावरील वाहतूक आवश्यकतेनुसार पर्यायी मार्गावर वळवण्यात येत आहे.

## संपादकीय ......

# संसद अधिवेशन : सरकार-विरोधकांची रणनीती

संसदेचे पावसाळी अधिवेशन आजपासून (२१ जुलै) सुरू होत आहे. देश अनेक आव्हाने आणि वादांमधून जात असताना हे अधिवेशन होत आहे; पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे, यावर्षी बिहारमध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत आणि हे अधिवेशन सत्ताधारी व विरोधी पक्षांसाठी आपापला अजेंडा अधिक धारदार करण्यासाठी एक शेवटचे मोठे व्यासपीठ ठरणार आहे. त्यामुळे या अधिवेशनाचे पडसाद केवळ संसदेपुरते मर्यादित राहणार नाहीत, तर त्याचा थेट परिणाम निवडणुकीची रणनीती आणि मतदारांच्या मानसिकतेवरही दिसून येईल.

पावसाळी अधिवेशनाची पार्श्वभूमी अत्यंत गंभीर आणि बहुस्तरीय आहे. जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेला दहशतवादी हल्ला आणि त्यानंतर राबवण्यात आलेले 'ऑपरेशन सिंदूर', युद्धविराम धोरणावरील अनिश्चितता, लष्करप्रमुख जनरल अनिल चौहान यांचे वक्तव्य आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा भारत-पाकिस्तान युद्ध थांबवल्याचा दावा या सर्व घटनांनी देशाचे सुरक्षा धोरण आणि राजनैतिक प्रतिष्ठा चर्चेच्या केंद्रस्थानी आणली आहे. या मुद्द्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या मौनावर विरोधक सातत्याने प्रश्नचिन्ह उपस्थित करत असून, संसदेत यावर जोरदार वादळी चर्चा होण्याची दाट शक्यता आहे.

या अधिवेशनात आठ महत्त्वाची विधेयके सादर होण्याची शक्यता आहे. यामध्ये मणिपूर वस्तू आणि सेवा कर (सुधारणा), जन विश्वास (तरतुदींमध्ये सुधारणा), भारतीय व्यवस्थापन संस्था (सुधारणा), कर प्रणाली कायदे (सुधारणा), खाण आणि खनिज (विकास आणि नियमन), सुधारणा राष्ट्रीय क्रीडा प्रशासन राष्ट्रीय डोपिंग विरोधी (सुधारणा) विधेयकांचा समावेश आहे. याशिवाय, मणिपूरमधील राष्ट्रपती राजवटीचा कालावधी वाढवण्याचा प्रस्तावही चर्चेत आहे. हा प्रस्ताव केवळ ईशान्येतील संवेदनशील परिस्थितीवरच प्रकाश टाकत नाही, तर केंद्र सरकारच्या प्रशासकीय धोरणांवरही प्रश्नचिन्ह निर्माण करतो. विरोधकांनी आधीच मणिपूरमध्ये 'घटनात्मक पोकळी' आणि 'केंद्राची उदासीनता' या मुद्द्यांवरून रान उठवले आहे.

दुसरीकडे पावसाळी अधिवेशनात सरकारला घेरण्यासाठी विरोधकांनीही पूर्ण तयारी केली आहे. विरोधी पक्षांनी किमान आठ प्रमुख मुद्द्यांवर सरकारकडून उत्तर मागण्याची रणनीती आखली आहे. यात सर्वात प्रमुख मुद्दा आहे, पहलगाममधील दहशतवादी हल्ला आणि 'ऑपरेशन सिंदूर', ज्यावरून गुप्तचर यंत्रणा आणि राजनैतिक तयारीवर प्रश्न विचारले जात आहेत. याशिवाय, निवडणूक आयोगाने बिहारमध्ये सुरू केलेल्या विशेष मतदार यादी पुनरीक्षण मोहिमेकडेही विरोधक संशयाच्या नजरेने पाहत असून, संभाव्य निवडणूक गैरप्रकारांची ही नांदी असल्याचा आरोप करत आहेत. जम्मू-काश्मीरला राज्याचा दर्जा पुन्हा बहाल करण्याची मागणी, लडाखला सहाव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्याचा मुद्दा, मणिपूरमधील हिंसाचार आणि अशांतता असूनही पंतप्रधानांनी अद्याप तिथे भेट न देणे, जातीय जनगणनेवरील अस्पष्टता आणि न्यायमूर्ती यशवंत वर्मा यांच्या विरोधातील प्रस्तावित महाभियोग या सर्व विषयांवर संसदेत वादळी चर्चेची तयारी विरोधकांनी केली आहे.

विरोधकांनी यावेळी अधिवेशनात व्यत्यय आणण्याऐवजी मुद्द्यांवर ठोस चर्चेला प्राधान्य देण्याचे म्हटले असले, तरी सत्ताधारी आणि विरोधकांमधील तीव- आरोप-प्रत्यारोपांमुळे अधिवेशन गदारोळाचेच ठरण्याची शक्यता आहे.

# शेतकऱ्यांसाठी महत्वाचे : सोयाबीन खोडमाशी, चक्रीभुंगा नियंत्रणाचे उपाय जाणून घ्या




**दि.२१विदर्भ प्रजासत्ताक**

सोयाबीनपीक सुरक्षित ठेवायचंय? खोडमाशी आणि चक्रीभुंगा यांचा वेळीच बंदोबस्त केल्यास शेतकऱ्यांना मोठं आर्थिक नुकसान टाळता येते. मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाने शिफारस केलेले उपाययोजना जाणून घ्या.

सोयाबीनपीक हे मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी एक महत्त्वाचे नगदी पीक आहे. मात्र, पीक पिकत असताना अनेक प्रकारच्या किडींचा प्रादुर्भाव होतो आणि त्यामुळे उत्पादनावर व गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो.

यात खोडमाशी आणि चक्रीभुंगा या दोन प्रमुख किडींचा समावेश होतो. या दोन्ही किडींचा प्रादुर्भाव वेळीच ओळखून नियंत्रण केल्यास शेतकऱ्यांचे नुकसान टाळता येते.

खोडमाशी व्यवस्थापन

खोडमाशी ही किड झाडाच्या खोडाला आतून पोखरून टाकते. त्यामुळे झाडाची ताकद कमी होते आणि उत्पादन घटते.

**नियंत्रणासाठी शिफारस**

५ टक्के निम्बोळी अर्काची ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

१० ते १५ टक्के झाडांवर




प्रादुर्भाव दिसल्यास कीटकनाशक फवारणी करावी.

प्रमुख कीटकनाशके आणि प्रमाण (१० लिटर पाण्यासाठी)

कीटकनाशकाचे नाव

प्रमाण

क्लोरअँट्रानिलिप्रोल १८.५% एससी ३ मिली

ईथिऑन ५०% ईसी ३० मिली

लँब्डा सायहॅलोथ्रिन ४.९% सीएस ६ मिली

थायोमिथोक्साम १२.६% + लँब्डा सायहॅलोथ्रिन ९.५% झेडसी २.५ मिली

क्लोरअँट्रानिलिप्रोल ९.३% + लँब्डा सायहॅलोथ्रिन ४.६% झेडसी ४ मिली

चक्रीभुंगा व्यवस्थापन

चक्रीभुंगा ही किड पानांवर गोलाकार खाण करून हिरवळ नष्ट करते. त्यामुळे झाडाची अन्न तयार करण्याची क्षमता कमी होते.

नियंत्रणासाठी शिफारस

५ टक्के निम्बोळी अर्काची ५० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी करावी.

३ ते ५ झाडांवर प्रादुर्भाव दिसल्यास कीटकनाशक फवारणी करावी.

प्रमुख कीटकनाशके आणि प्रमाण (१० लिटर पाण्यासाठी)

कीटकनाशकाचे नाव

प्रमाण

प्रोफेनोफॉस २० मिली

ईथिऑन ५०% ईसी ३० मिली

क्लोरअँट्रानिलिप्रोल १८.५% एससी ३ मिली

टेट्रानिलिप्रोल १८.५% एससी ५ मिली

इमामेक्टिन बेंझोएट ५% एससी ८.५ मिली

बीटा-सायफ्लुथ्रिन २.४% + इमिडाक्लोप्रिड १९.८% ओडी ७ मिली

ऑस्टीनप्राईड ९% + बायफेंथ्रीन २५% डब्ल्यूजी ४ ग्रॅम

थायमिथोक्साम १२.६% + लँब्डा सायहॅलोथ्रिन ९.५% झेडसी २.५ मिली

क्लोरअँट्रानिलिप्रोल ९.३% + लँब्डा सायहॅलोथ्रिन ४.६% झेडसी ४ मिली

**महत्त्वाच्या टिप्स**

सर्व फवारणी करताना शेतमाल सुरक्षिततेचे नियम पाळावेत.हातमोजे, चष्मा व मास्क वापरावा.

कीटकनाशकाच्या शिफारस केलेल्या प्रमाणातच वापर करावा.

एका हंगामात एकाच कीटकनाशकाचा वारंवार वापर टाळावा.

**(सौजन्य : पिकांवरील कीड-रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प, किटकशास्त्र विभाग, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी)**

शेतकरी ते थेट ग्राहक
**कामधेनु नॅचरल्स**
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाव्दारे अमरावती विभागातील गरजूंना ६ कोटी ८२ लाखांची मदत

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष : गोर-गरीब, गरजू रुग्णांसाठी संजिवनी

राज्यभरासह अमरावती विभागातील गरजू रुग्णांना अडचणींच्या प्रसंगी मदतीचा हात देत मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाने महत्वपूर्ण टप्पे गाठले आहेत. राज्यातील हजारो गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांच्या दुर्धर आजारावर तातडीने उपचार होण्यासाठी अत्यंत आवश्यक आर्थिक मदत पुरवून या निधीने आरोग्य सेवेप्रती आपली बांधिलकी दर्शविली आहे. गत सहा महिन्यात म्हणजे १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत अमरावती विभागांतर्गत येणाऱ्या पाचही जिल्ह्यातील या कक्षाव्दारे ७६३ गरजू व पात्र रुग्णांना गंभीर व दुर्धर आजारावरील वैद्यकीय उपचारासाठी एकूण ६ कोटी ८२ लाख ९१ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले, ज्यामुळे असंख्य जीव वाचले आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली, गोरगरीब आणि गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी थेट आर्थिक मदत देण्यासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष महत्त्वाचे ठरले आहे. सहाय्यता निधी प्राप्त करण्याकरिता संबंधित रुग्णांच्या नातेवाईकांना मुंबई येथे अर्ज सादर करण्यासाठी जावे लागत असे, त्यात बऱ्याच अडचणीही येत असत. ही अडचण दूर करुन गोर-गरीब रुग्णांना त्यांच्या स्वजिल्ह्यातच हे अर्थसहाय्य उपलब्ध होण्याच्या उद्देशाने मुख्यमंत्र्यांच्या संकल्पनेतून राज्यातील सर्व जिल्ह्यांत जिल्हाधिकारी कार्यालयात हा कक्ष स्थापित करण्यात आला आहे. गरजूंना तसेच सामान्य जनतेला मार्गदर्शन व तत्काळ मदत उपलब्ध करुन देण्यासाठी डॉक्टराची नोडल ऑफीसर म्हणून या कक्षात नेमणूक करण्यात आली आहे. मुख्यमंत्र्यांच्या सूचनेनुसार, मदत कक्षाच्या कार्यालयात आलेला एकही रुग्ण मदतीविना वंचित राहू नये, या तत्त्वावर कक्षाचे काम सुरू आहे. याच प्रयत्नांमुळे अमरावती विभागातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा आणि वाशिम या पाचही जिल्हास्तरीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षातून उत्तम रुग्णसेवेचे कार्य सुरू असून अनेक रुग्णांना निधी वितरीत करण्यात आला आहे.




जानेवारी ते जून २०२५ पर्यंत ६ कोटी ८२ लाख ९१ हजार रुपयांची मदत*अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित असलेल्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाव्दारे १ जानेवारी ते ३० जून २०२५ या कालावधीत अमरावती जिल्ह्यातील १७३ रुग्णांना १ कोटी ६९ लाख १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य वितरीत करण्यात आले. अकोला जिल्ह्यातील ४० रुग्णांना ३० लाख ३० हजार रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली. यवतमाळ जिल्ह्यातील ८६ रुग्णांना ७९ लाख ८२ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. बुलडाणा जिल्ह्यातील ३४८ रुग्णांना २ कोटी ८९ लाख ४ हजार रुपयांचे अर्थसहाय्य देण्यात आले. तर वाशिम जिल्ह्यातील ११६ रुग्णांना १ कोटी १४ लाख ६० हजार रुपयांची वैद्यकीय मदत वितरीत करण्यात आली आहे.

*असा आहे उपक्रम*महाराष्ट्रातील गरजू व पात्र रूग्णांना वैद्यकीय उपचाराकरिता आर्थिक मदतीचा हातभार लावण्याकरिता मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली शासनाने सुरू केलेला हा लोकोपयोगी व महत्वाकांक्षी उपक्रम आहे.

*योजनेसाठी पात्रता व निकष*या उपक्रमाचा लाभ घेण्याकरिता अर्जदार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा लागतो. अर्जदाराचे वार्षिक कौटुंबिक उत्पन्न १.६० लाखांच्या आत असणे आवश्यक आहे. रूग्णाकडे रेशन कार्ड व आधार कार्ड असणेही गरजेचे आहे. उपचार घेत असलेले रूग्णालय महाराष्ट्र राज्यामधील असणे आवश्यक असून रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक असते.

*अर्थसहाय्य मिळू शकणारे आजार*या महत्वाकांक्षी उपक्रमांतर्गत काही ठराविक आजार चिन्हीत करण्यात आले आहे. यामध्ये कॉकलियर ईम्प्लांट/ अंतस्त कर्णरोपण शस्त्रक्रिया (वय २ ते ६ वर्षांपर्यंत), हृदय/यकृत/ किडणी/फुफ्फुस/बोन मॅरो आणि हाताचे प्रत्यारोपण, कर्करोग/ रस्ते अपघात/लहान बालकांची शस्त्रक्रिया/मेंदुरोग/ हृदयरोग आणि हिप रिप्लेसमेंट सर्जरी यासह डायलिसिस/केमोथेरेपी/ रेडिएशन/नवजात शिशुंचे आजार/गुडघ्याचे प्रत्यारोपण/ भाजलेले रूग्ण/अस्थीबंधन आणि विद्युत अपघात आदी आजारांचा समावेश होतो.

*योजनेच्या लाभासाठी आवश्यक कागदपत्रे*वैद्यकीय सहाय्यता मदत कक्षाकडून अर्थसहाय्य प्राप्त करण्याकरिता विहित नमुन्यातील अर्ज, वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रकाची मूळप्रत, डॉक्टरांच्या सही व शिक्यासह (खाजगी रुग्णालय असल्यास जिल्हा शल्यचिकित्सक यांचेकडून प्रमाणीत करणे आवश्यक आहे), तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला (रु. १ लाख ६० हजार पेक्षा कमी), रुग्णाचे आधार कार्ड (महाराष्ट्र राज्याचे)/नवजात बाळासाठी आईचे आधारकार्ड आवश्यक आहे, रुग्णाचे रेशन कार्ड (महाराष्ट्र राज्याचे), संबधीत आजाराचे रिपोर्ट (ईन्व्हेस्टिगेशन रिपोर्टस) असणे आवश्यक, रुग्णाचा पासपोर्ट फोटो, अवयव प्रत्यारोपण रुग्णांसाठी झेडटीसीसी/ शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे, रस्ते अपघात असल्यास एफआयआरची प्रत जोडणे आवश्यक आहे.

*असा करता येईल अर्ज*या उपक्रमांतर्गत अर्थसहाय्य प्राप्त मिळविण्यासाठी प्रत्येक जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मदाय रुग्णालय मदत कक्ष स्थापित करण्यात आले आहेत. विहीत नमुन्यात मुळ अर्ज, सर्व आवश्यक कागदपत्रांसह संबंधित जिल्ह्याच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे सादर करणे आवश्यक आहे. अर्जाचा नमुना https://cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

*लाभासाठी रूग्णालयाची अट*या उपक्रमाचा लाभ घेण्यासाठी रूगणालय हे नोंदणीकृत असणे गरजेचे असून संबंधित रूग्णालयाची नोंद मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या प्रणालीमध्ये असणे आवश्यक आहे. रूग्णालयामध्ये महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना/आयुष्यमान भारत योजना/धर्मदाय रूग्णालय/ आरबीएसके इत्यादी योजना कार्यान्वीत असल्यास या योजनांमधून रूग्णाचा उपचार होणे बंधनकारक आहे व रूग्णाचा आजार या योजनेमध्ये बसत नसल्यास तसे प्रमाणपत्र खर्चाच्या अंदाजपत्रकासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच रुग्णाला डिस्चार्ज होण्याच्या पूर्वी अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

*किती रकमेपर्यंत मिळू शकते मदत*रूग्णाच्या आजाराचे व उपचाराचे स्वरूप, इन्व्हेस्टीगेशन रिपोर्ट याचे अवलोकन करून कार्यकारिणी समिती नियमाप्रमाणे निर्णय घेत जास्तीत जास्त २ लाखांचे अर्थसहाय्य हृदय/यकृत/ किडणी/फुप्फुस आणि बोन मॅरो प्रत्यारोपणाकरिता करण्यात येते.गरजू व गरीब नागरिकांना गंभीर, दुर्धर आजाराच्यावेळी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाव्दारे देण्यात येणारी मदत बहुमोलाची ठरत आहे. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाकडून गरजू रुग्णांना वेळेत मदत मिळावी, यासाठी राज्यातील सर्व मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष प्रयत्नशील असतात, अशी माहिती मुंबई मंत्रालय येथील राज्यातील सर्व सहाय्यता कक्षाचे समन्वयक रामेश्वर नाईक यांनी दिली. संवेदनशील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनातून जिल्हास्तरावर सहाय्यता कक्ष उपलब्ध झाल्याने अनेक गोर-गरीब, गरजू रुग्णांना दिलासा मिळाला आहे. अधिकाधिक गरजूंपर्यंत हा लाभ पोहचावा या उद्देशाने मुख्यमंत्री कार्यालयही या उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करीत आहे. कठीण प्रसंगी मुख्यमंत्री कार्यालय सर्वसामान्यांच्या पाठीशी भक्कमपणे उभे असल्याने, त्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे.

**विजय राऊत**
सहायक संचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय,
अमरावती






## वजन झटपट कमी कण्यासाठी रोज सकाळी रिकाम्या पोटी प्या 'या' ड्राय फ्रूटचे पाणी

**दि.२१ विदर्भ प्रजासत्ताक**

मनुके खाण्याचे आरोग्यदायी फायदे आपल्या सर्वांनाच माहित आहेत. ऊर्जा मिळवण्यापासून ते रक्ताची कमतरता भरून काढण्यापर्यंत मनुके खाणे हा एक उत्तम पर्याय आहे. पण तुम्हाला माहित आहे का, की मनुके खाण्यापेक्षाही त्याचे पाणी पिणे आरोग्यासाठी अनेक पटींनी फायदेशीर ठरू शकते? आरोग्य तज्ज्ञांच्या मते, मनुक्याचे पाणी आरोग्यासाठी अमृतासमान आहे. विशेषतः सकाळी रिकाम्या पोटी याचे सेवन केल्यास शरीराला अनेक आश्चर्यकारक फायदे मिळतात. चला तर मग जाणून घेऊया या जादुई पेयाबद्दल.

**वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी मदत**

वाढलेले वजन ही आजच्या जीवनशैलीतील एक मोठी समस्या बनली आहे. जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल, तर मनुक्याचे पाणी तुमच्यासाठी खूप उपयुक्त ठरू शकते. मनुक्याच्या पाण्यात नैसर्गिक साखर असते, जी



तुम्हाला दिवसभर ऊर्जावान ठेवते आणि गोड पदार्थ खाण्याची इच्छा कमी करते. यामुळे अनावश्यक कॅलरीजचे सेवन टळते. तसेच, यातील फायबरमुळे पचनक्रिया सुधारते आणि पोट बराच वेळ भरलेले राहते, ज्यामुळे वजन नियंत्रणात राहण्यास मोठी मदत होते.

**त्वचा आणि केसांसाठी वरदान**

मनुक्याचे पाणी एक उत्तम 'ब्लड प्युरिफायर' (रक्त शुद्ध करणारे) म्हणून काम करते. शरीरातील विषारी घटक (ढु-ळपी) बाहेर टाकल्यामुळे रक्ताभिसरण सुधारते. याचा थेट परिणाम तुमच्या त्वचेवर दिसून येतो आणि त्वचा आतून चमकदार व निरोगी बनते. यातील अँटीऑक्सिडंट्स त्वचेला फ्री रॅडिकल्सपासून वाचवतात, ज्यामुळे मुरुमे आणि सुरकुत्यांची समस्या कमी होते. इतकेच नाही, तर केसांच्या मुळांना योग्य पोषण मिळाल्याने केस गळणे कमी होऊन ते मजबूत आणि दाट होतात.

**इतर आरोग्यदायी फायदे**

मनुक्याच्या पाण्याचे फायदे केवळ वजन आणि सौंदर्यापुरते मर्यादित नाहीत. याचे इतरही अनेक फायदे आहेत:

**सिडिटीपासून आराम:** रात्री भिजवलेल्या मनुक्याचे पाणी सकाळी प्यायल्याने पोटातील सिडची पातळी नियंत्रणात राहते आणि सिडिटी व बद्धकोष्ठतेसारख्या समस्यांपासून आराम मिळतो.

**रक्ताची कमतरता दूर करते:** मनुके लोहाचा उत्तम स्रोत आहेत. नियमितपणे याचे पाणी प्यायल्याने शरीरातील रक्ताची कमतरता भरून निघते आणि निमियाचा धोका टळतो.

**यकृताचे आरोग्य:** हे पेय यकृतामधील विषारी घटक बाहेर काढून ते स्वच्छ ठेवण्यास मदत करते, ज्यामुळे यकृताचे कार्य सुधारते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २१ जुलै २०२५

शहर/ग्रामिण

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा


# राज्य निवडणूक आयुक्त विनेश वाघमारे २४ जुलै रोजी जिल्हा दौऱ्यावर

## निवडणुकीच्या तयारीचा घेणार आढावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणार असल्याची शक्यता राज्य निवडणूक आयोगाने वर्तविली आहे. त्यानुसार प्रशासन कामाला लागले. यात राजकीय पक्षही मागे नाही. राजकीय पक्षाने ही आपल्या मोर्चेबांधणीला सुरूवात केली आहे. राज्य निवडणूक आयुक्त विनेश वाघमारे हे २४ जुलै रोजी जिल्हा दौऱ्यावर आहेत. २४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता अमरावती विभागीय आयुक्तालयात बैठक होईल. या बैठकीत महापालिका निवडणुकीच्या अनुषंगाने तयारीचा आढावा घेतील तसेच प्रशासनाला सूचना देतील.२५ जुलै रोजी वाघमारे हे अकोल्याला रवाना होतील आणि तेथील नागरी निवडणुकीच्या तयारीचे निरीक्षण करतील आणि आवश्यक सूचना देतील.जिल्ह्यातील १४ पंचायत समित्या, १० नगरपालिका, २ नगर पंचायती, अमरावती महापालिका आणि जिल्हा परिषद निवडणुकीची तयारी सुरू आहे. जिल्हापरिषद आणि पंचायत समितीचे विभाग आणि मंडळे जाहीर करण्यात आली आहेत. त्यावर हरकती मागकवण्यात आल्या. २१ जुलैनंतर मंडळांच्या सीमा निश्चित केल्या जातील. महापालिका आणि पालिका येथे विभाग निर्माण करण्याचे




काम सुरू झाले आहे. पुढील आठवड्यात येणारे राज्य निवडणूक आयुक्त वाघमारे मतदार यादी, बूथ, ईव्हीएम आणि जनजागृतीसाठी स्वीप उपक्रम, निवडणुकीसाठी आवश्यक असलेले मनुष्यबळ इत्यादींचे निरीक्षण करतील आणि योग्य सूचना देतील.सूत्रांच्या नुसार निवडणूक आयुक्त वाघमारे हे नागपूर आणि चंद्रपूर महापालिका निवडणुकीसाठी २३ जुलै रोजी नागपूर विभाग कार्यालयात बैठक घेणार आहेत. राज्य आयोगाने निवडणुका पारदर्शक ठेवण्यासाठी काही सूचना आधीच जारी केल्या आहेत. त्यानुसार, जर निवडणुकीशी थेट संबंधित अधिकारी विभाग स्थापनेच्या आदेशाच्या दिवसापासून तीन वर्षे त्या पदावर असेल, तर त्याला आरओ किंवा एआरओ म्हणून नियुक्त करता येणार नाही. आयोगाने यासंदर्भात स्पष्ट आदेश दिले आहेत. त्याचप्रमाणे, त्याविभागात राहणाऱ्या लोकांनाही त्या विभागात निवडणूक कामापासून दूर ठेवण्यात येईल. आयोगाने थेट निवडणुकीशी संबंधित निवडणूक अधिकारी, सहाय्यक निवडणूक अधिकारी, मीडिया सेल, आचारसंहिता प्रमुख इत्यादींसाठी निकष जारी केले आहेत.स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या निमित्ताने राजकीय पक्षही कामाला लागले आहेत. आपापल्या पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे सत्र सुरू झाले आहे. महाविकास आघाडी व महायुतीसंदर्भात घटक पक्षांमध्ये सध्या तरी संभ्रम दिसून येत आहे.-

# मेळघाट मधील झिल्पी गावातील युवक जंगलातून बेपत्ता

## वाघाने शिकार केल्याचा संशयनातेवाईकांकडून पोलिसात बेपत्ता व वाघाने शिकार केली असल्याची तक्रार



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१धारणी** -धारणी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या झिल्पी गावातील ३१ वर्षीय युवक हा एका व्यापाऱ्याकडे त्याने विकत घेतलेले जनावरे पायदळ अकोट येथे पोहोचून देण्याचे काम करत होता ते जनावरे पोहोचून देण्यासाठी तो रविवारी घरून निघून गेल्याचे त्याने घरी सांगितले परंतु तो रविवार पासून घरी आला व्याघ्र प्रकल्पाच्या जंगल मार्गे त्याचा प्रवास असल्याने त्याची वाघाणे शिकार केली असल्याचा संशय नातेवाईकांनी व्यक्त करत तो घरून बेपत्ता असल्याची तक्रार धारणी पोलिसात दिली आहेधारणी पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या झिल्पी गावातील रहिवासी रामसिंग रामचंद्र मावसकर वय ३१ वर्ष हा युवक रविवारी एका व्यापाऱ्याकडे त्या व्यापाऱ्यांनी खरेदी केलेले जनावरे अकोट येथे पोहोचून देण्याचे काम रोजनदारीने करतो ती जनावरे व्याघ्र प्रकल्पाच्या जंगल मार्गाने पायदळ सुसर्दा राणीगाव, धुलघाट रेल्वे, गोलाई, झरी मार्गे, प्रवास करत अकोट येथे पोहोचून देण्यासाठी रविवारी घरून निघून जात असल्याची माहिती त्यांने दोन भाऊ व बहिणीला दिली घरी दिली परंतु तो युवक रविवार पासून अद्याप आठ दिवसाचा कालावधी लोटल्यानंतरही तो घरी न आल्यामुळे त्याचा भाऊ अमरलाल रामचंद मावसकर, फुलचंद रामचंद मावसकर, व बहिण सरस्वती बळीराम धांडे या तीनही भाऊबंदांनी त्याचा शोध सुरू केला शोध सुरू केला त्यादरम्यान त्यांनी धुळघाट रेल्वे गावापर्यंत त्याची माहिती घेण्यासाठी धाव घेतली असता धुळघाट रेल्वे येथील काही ग्रामस्थांनी त्यांना तुमच्या भावाची वाघाने शिकार केली असल्याची माहिती दिली त्या माहितीच्या आधारे त्याच्या बहिण आणि भावांनी मेळघाटचे माजी आमदार प्रभूदास भिलावेकर , प्रकाश मावसकर श्याम गंगराळे अंबर बनसोड जया ताई खंडारे व गावातील ग्रामस्थ यांच्या मदतीने धारणी पोलिसात तो मागील आठवड्यातील रविवार पासून बेपत्ता असल्याची व त्याची वाघाने शिकार केला असल्याचा संशय असल्याची पोलीस तक्रार शनिवारी सायंकाळी नोंदविली त्याचा शोध धारणी पोलीस, व वनविभागाचे पथक यांनी सुरू केला असून अध्याप पर्यंत त्याचा शोध कुठेही लागलेला नाही त्यामुळे नेमकी वाघाची शिकार की आणखी काय याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे त्याबाबत पुढील तपास धारणी पोलिस निरीक्षक अवतार सिंग चव्हाण व त्याचे पोलीस चमू सह व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी कर्मचारी यांच्या कडून सुरू आहे.

# संत गाडगेबाबा सूतगिरणीच्या पुनरुज्जीवनासाठी

## मंत्रीस्तरीय बैठक २३ जुलैला

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

दर्यापूर येथील संत गाडगेबाबा सहकारी सूतगिरणीच्या पुनरुज्जीवनासाठी महत्त्वपूर्ण हालचालींना वेग आला असून २३ जुलै रोजी दुपारी १२ वाजता वस्त्रोद्योग मंत्री ना. संजय सावकारे यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालय, मुंबई येथे मंत्रीस्तरीय बैठक होणार आहे.



**खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा व प्रकाश भारसाकळे यांचा पुढाकार**







ही बैठक मंत्रालयाच्या दालन क्रमांक ३०३, समिती कक्षात आयोजित करण्यात आली असून सहकार व पणन विभागाचे कक्ष अधिकारी श्री. तुषार शिंदे यांनी यासंदर्भात पत्राद्वारे आमदार रवी राणा, खासदार डॉ. अनिल बोंडे व आमदार प्रकाश भारसाकळे यांना निमंत्रण दिले आहे, अशी माहिती आमदार रवी राणा यांचे स्वीय सचिव उमेश ढोणे यांनी दिली.दर्यापूर तालुक्यातील ही सूतगिरणी अनेक वर्षांपासून बंद असून त्यामुळे शेकडो कामगार बेरोजगार झाले आहेत. शेतकऱ्यांचे कापूस विक्रीचे पर्याय कमी झाले असून स्थानिक अर्थव्यवस्थेवरही त्याचा विपरीत परिणाम झाला आहे.

या पार्श्वभूमीवर होणाऱ्या मंत्रीस्तरीय बैठकीकडे दर्यापूर तालुक्यातील शेतकरी, कामगार आणि नागरिकांचे लक्ष लागून आहे. या बैठकीत सूतगिरणीच्या पुनर्संचलनाबाबत सकारात्मक निर्णय घेतला जाईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# युनिकॉन स्पा वर शहर गुन्हे शाखेची धडक कारवाई

## सहा युवती सह तीन युवकांना अटक

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती :**

शहरातील युनिकॉन स्पा सेंटरवर अमरावती शहर गुन्हे शाखा युनिट-२ कडून धडक कारवाई करण्यात आली. या कारवाईत स्पामधील ३ ग्राहकांना अटक करण्यात आली असून, ६ तरुणींना ताब्यात घेण्यात आले आहे. संबंधित तरुणी दिल्ली, मुंबई व औरंगाबाद येथील असल्याचे उघड झाले आहे.

या स्पा सेंटरचे मालक सोमेश्वर येवते, रहिवासी मुंबई, यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर

### यापूर्वीसुध्दा झाली होती कारवाई

पॅन्टलून्स येथील स्पा सेंटरमध्ये याआधीसुध्दा पोलिसांनी धाड टाकून मुला-मुलींसह स्पा सेंटर चालकावर कारवाई केली होती. परंतु कारवाई केल्यानंतर दुसऱ्याच दिवशी चालकाने स्पा सेंटर उघडून दुकानदारी सुरु केली होती




स्पाचा व्यवस्थापक संजय भरतसिंग राजपूत (वय २४, रा. ललितपुरा, उत्तर प्रदेश) यालाही पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.ही कारवाई पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. अमरावती शहर गुन्हे शाखेच्या युनिट २ ने मिळालेल्या गुप्त माहितीनुसार ही धडक कार्यवाही करण्यात आली.या कारवाईमुळे शहरातील बोगस स्पा सेंटर्सवर पोलिसांकडून होत असलेल्या कारवाईचा धसका दिसून येत आहे.

### शनिवारी व रविवारी ग्राहकांची तोबा गर्दी

शनिवारी व रविवार सुट्टीचा दिवस असल्यामुळे अशा स्पा सेंटरवर आंबट शौकीनांची चांगलीच गर्दी असते. त्यामुळे सकाळपासून ते रात्री ११ पर्यंत स्पा सेंटर चोरून लपून सुरु राहतात. तसेच शहरासह बाहेर गावातील युवकसुध्दा मसाज करण्याकरिता शहरात येतात.

# अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या अग्निशमन वाहनांचा गैरवापर?

## अग्निशमन गाडीचा चक्क नाल्यांच्या सफाईसाठी वापर, नागरिकांत संतापाची लाट!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अंजनगाव सुर्जी** - महानगरपालिका व नगरपालिकांसाठी अग्निशमन सेवा ही एक अत्यावश्यक आणि आपत्कालीन सेवा आहे. महाराष्ट्र शासनाच्या स्पष्ट परिपत्रकानुसार, अग्निशमन वाहनांचा वापर केवळ आगीसारख्या आपत्तीजनक प्रसंगीच करणे बंधनकारक आहे. मात्र, अंजनगाव सुर्जी नगरपालिकेकडून या आदेशाला धाब्यावर बसवत अग्निशमन वाहनांचा सर्रास गैरवापर होत असल्याचे धक्कादायक वास्तव उघडकीस आले आहे.रविवार, दिनांक २० रोजी शासकीय सुटीच्या दिवशी उपमुख्याधिकारी गोविंद त्रिपुरारी यांच्या प्रभागातील सुर्जी परिसरातील सांडपाण्याच्या नाल्यांची साफसफाई अग्निशमन वाहनाच्या साहाय्याने करण्यात आली. विशेष म्हणजे, ही कृती अगदी खुलेआम करण्यात आली असून नागरिकांनी याचा व्हिडिओ व फोटो सोशल मीडियावर व्हायरल केल्याने हा प्रकार प्रकाशझोतात आला



आहे.अग्निशमन विभागाचे कर्मचारी व अधिकारी स्वतः शासनाच्या परिपत्रकाचे उल्लंघन करत असल्यामुळे नागरिकांत तीव्र नाराजी पसरली आहे. पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर संभाव्य आगीच्या घटनांवर तातडीने प्रतिसाद देण्यासाठी ही वाहने सदैव सज्ज असायला हवीत. मात्र, प्रशासनाच्या ढिसाळ नियोजनामुळे एखादी आपत्कालीन घटना घडली असती, तर जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.या प्रकारामुळे अंजनगाव सुर्जी नगरपालिकेच्या बेजबाबदार कारभारावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून, संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

# इंस्टाग्रामवर मैत्रीचा फायदा घेऊन अल्पवयीन मुलीवर बलात्कार

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.२१ अंजनगाव सुर्जी-**

इंस्टाग्रामवरच्या मैत्रीचा फायदा घेवून अल्पवयीन मुलीवर बलात्कार केल्याची घटना अंजनगाव सुर्जी शहरात घडली याबाबत दि. १६ जुलै रोजी दुपारी ४ वाजताच्या सुमारास पिडीता अल्पवयीन मुली कडुन अंजनगाव पोलीसात तक्रार दाखल करण्यात आली तक्रारीवरून आरोपीला पोलिसांनी अटक केली.सोशल मिडीया वरील फेसबुक व इस्टाग्रामच्या माध्यमातून नवतरुन युवक युवतींच्या मैत्री चे आडंबर माजले आहे. यामध्ये प्रथम मोबाईल वरुन ओळख, गाठिभेटी, जीवन मरणाच्या,लग्नाच्या आणाभाका देऊन शारीरिकसंमध प्रस्थापीत करुन मुलींचे शारिरीक शोषन करत त्यांना प्रताडीत केल्या जाण्याचे घटना ही नित्याची बाब झाली आहे.याच पठडीतील घटना अंजनगाव सूर्जी पोलीस स्टेशन हद्दीत घडली १७ वर्ष ९ महीने वयाच्या अल्पवयीन पीडीतेची आरोपी मृदुल उर्फ गोलू प्र.कोकाटे ( २७ ) रा.अंजनगाव सुर्जी सोबत इंन्स्टाग्रामवर मैत्री व ओळख झाल्या नंतर आरोपीने अल्पवयीन पीडीतेला तु मला आवडते म्हणत फीर्यादि पीडीतेला उन्हाळ्याच्या सुटी कालावधी २०२४ मध्ये त्याचे घरी भेटायला बोलावले व शारिरीक संबंध ठेवण्यासाठी जबरदस्ती केली. पिडीतेने त्याला नकार दिला आरोपीने तीला' मी गळफास घेवून मरेल अशी धमकी दिल्यावर




आरोपीने फिर्यादीला जबरदस्ती खाली पाडून अल्पवयीन पिडीतेशी जबरीने शारीरीक संमंध प्रस्थापीत केले व मैत्री ठेवण्यासाठी धमकी दिली.अल्पवयीन पिडीतेने काही दिवसांनी आरोपी मृदुल उर्फ गोलुशी बोलने बंद केल्यावर आरोपीने मुलीच्याआई वडीलांना शिवीगाळ करत तु माझेशी बोलली नाही तर गळफास घेऊन आत्महत्या करेन अशी धमकी देवून तिच्या सोबत दि. १८/४/२०२४ ते १३ /३/२०२५ पर्यंत वारंवार शारिरीक संबंध प्रस्थापित केले.याबाबत पिडीतेने घरी सांगीतल्यावर घरच्यांनी आरोपीसह तीला बोलण्यास मज्जाव केला. परंतु दि.१६ रोजी पिडीता शाळेत जात असतांना आरोपीने पीडीतेला बोलण्याची जबरदस्ती केली, ती बोलली नाहीचा रागधरुन आरोपी गोलुने शीवीगाळ करत मारपीटकरत तिला ओढतान केली असता पीडीताने आईसह पोलीस स्टेशन गाठत फीर्याद दाखल केली.अल्पवयीन पिडीतीचे तक्रारीवरुन पोलिस स्टेशन अंजनगाव सुर्जी येथे आरोपीविरुद्ध बालकांचे लैगीक अपराधापासुन संरक्षण अधिनियम२०१२ अन्वये ३४५/०२५ कलम६४(१) ६४(२)(म)१२६(१)११५(२) नुसार गुन्ह्याची नोंद करुन आरोपीला अटक केली गुन्ह्याचे पुढील तपास ठाणेदार प्रकाष अहीरे यांचे मार्गदशनात तपास अधिकारी स.पो.नि. विनोद धाडसे करीत आहे.

# नेहरु मैदानात ड्रग्जची डिलेव्हरी करणारे दोघे जेरबंद, ११०ग्रॅम एम.डी. ड्रग्ज जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती** - शहरातील नेहरु मैदानात एमडी ड्रग्जची डिलेव्हरी करणाऱ्या दोघांना गुन्हे शाखेच्या पथकाने अटक करून ४ लाख ४० हजार रुपयांची ११० ग्रॅम एम.डी. व अन्य साहित्य जप्त करून दोघांना अटक केली. अतिक बेग अनिस बेग (वय ३० रा. तालाबपुरा) आणि मोहम्मद रिजवान अब्दुल गणी (वय २८ रा. अकबरनगर) अशी अटकेतील युवकांची नावे आहेत.अमरावती शहरात मोठ्या



प्रमाणात अंमली पदार्थ व एमडी ड्रग्जची तस्करी होत आहे. याबाबत आमदार संजय खोडके यांनी पावसाळी अधिवेशनात मुद्दा उचलुन धरला होता. त्यामुळे शहरातील पोलीस यंत्रणा सतर्क झाली असून धडक कारवाई सुरु केली आहे. दरम्यान रविवारी रात्री नेहरु मैदानात एमडी ड्रग्जची खेप येत असल्याचीमाहिती गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांना मिळताच त्यांनी पथकासह मैदानात सापळा रचला. तेव्हा एका ऑटो चालक आणि एक व्यक्ती संशयीतरित्या दिसताच पोलिसांनी त्याना ताब्यात घेतले आणि त्यांची अंगझडती घेतली असता त्याच्या जवळ ११० एम.डी. ड्रग्ज मिळताच पोलिसांनी दोघांना अटक करून कोतवाली पोलिसांच्या ताब्यात दिले.

# आदिवासींच्या कल्याणासाठी आयुष्य वेचणाऱ्या रमेश मावस्कर यांच्या कार्याची राष्ट्रपती भवनाकडून दखल

## आज महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांच्याशी साधणार संवाद

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१धारणी–** शापित ठरलं कुपोषित जीवन सदाच हरलं मुक्या वेदनांना इवल्या डोळ्यात कुणी पेरलं..?या प्रसिद्ध कवी प्रकाश विंचूरकर यांच्या मेळघाटविषयी असलेल्या कवितेच्या ओळी येथलं वास्तव समर्पकपणे माडतं..! येथल्या आरोग्य, शिक्षण, मुलभूत सुविधांसाठी गेली अनेक दशके वाट पाहणा–या आदिवासौंच्या व्यथा वेदनांना समजुन घेत एक आदिवासी तरुण उच्च विद्या विभूषित होतो... खडकाळ जीवनाच्या वाटेवरून जाताना आपल्या बांधवांच्या हुंकारांना तो ऐकतो... उच्च पदावर पोहचतो.. समाजसेवेसाठी निवृत्ती घेतो आणि झपाटल्याप्रमाणे उर्वरित आयुष्य समाजबांधवांसाठी वेचतो... लढतो.. झटतो.. कठीण प्रसंगी धावून जातो. अविरत सेवा हाच परमोच्च सेवाभाव हे ब्रीद जीवनाला चिकटवून घेतो.. अशा या समाज सेवकाची दखल खुद्द राष्ट्रपतीभवनाला घ्यावीशी वाटावी... ही त्या व्यक्तिमत्वाच्या प्रामाणिक कार्याची घेतलेली दखल आज मेळघाट वासियांसाठी भूषणावह नक्कीच आहे. माजी उपायुक्त रमेश मावस्कर यांना राष्ट्रपती भवनाकडुन भेटीचे निमंत्रण आले असुन ते आज. २१लाराष्ट्रपती भवनात महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मुर्मू यांच्याशी मेळघाटातील अनेक विषयांवर संवाद साधणार असून राष्ट्रपतींसमवेत भोजन करणार आहे.रमेश मावस्कर हे माजी आमदार पटल्या गुरूजी मावस्कर यांचे चिरंजीव आहेत. उपायुक्त पदावरून निवृत्त झाल्यानंतर त्यांनी मेळघाटातील समाजसेवेला प्रारंभ केला. शासनाच्या अधिपत्याखाली असलेल्या भारत हेवी इलेक्ट्रिक लिमिटेड (भेल) या नामवंत कंपनीवर अशासकीय संचालक प्रतिनिधी असलेले रमेश मावस्कर यांनी समाजसेवेचे व्रत हाती घेतले, २०१९ ला मेळघाट विधानसभा निवडणुक लढविली. ते पराभूत झाले. परंतु आदिवासींच्या समस्या सोडविण्यासाठी ते अविरत अविश्रांत कार्यमग्न राहिले.

'कुपोषण' ही मेळघाटातील प्रमुख समस्या आहे. शिक्षणाचा असलेला अभाव अज्ञानात राहिलेला हा आदिवासी समाज शोषित राहिला. या शोषणातून बाहेर काढण्यासाठी... समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी रमेश मावस्कर यांचे कार्य अविरत सुरू आहे.रमेश मावस्कर यांच्या खांद्याला खांदा



लावत त्यांच्या धर्म पत्नी सौ रेखाताई यांनी आदिवासींच्या पाल्यांसाठी अनेक उपक्रम, योजना राबविल्या.. या सेवेत सातत्य ठेवत दाम्पत्य मावस्कर आज आदिवासींच्या गळ्यातील ताईत ठरले आहे. रमेश मावस्कर यांच्या कार्याची दखल राष्ट्रपती भवनाने घ्यावी ही मेळघाट वासियांसाठी अत्यंत भूषणावह बाब आहे. मेळघाटातील आरोग्याच्या सुविधा डोंगरद–यातील आदिवासींच्या गावापर्यंत अद्याप पोहचल्या नाही. पावसाळ्यात येथली दुर्गम अतिदुर्गम भागातील व्यवस्था कोलमडून पडते. असंख्य गावांचा शासकीय यंत्रणे पासुन संपर्क तुटतो. येथुनच समस्यांचा जन्म होतो. रांगड्या जीवनशैलीतला हा आदिवासी बांधव सुविधांपासून वंचित राहतो.... तेथूनच समस्यांचे शुक्ल काष्ठ त्याचा पिच्छा पुरविते. या पावसाळ्याच्या दिवसात आदिवासी बांधवांना सर्व सुविधा मिळाव्यात यासाठी शासन व आदिवासींमधला दुवा म्हणून रमेशमावस्कर कार्य करीत आहे.एकल व वनवासी कल्याण आश्रम तर्फे चालविण्यात येणा–या कार्यातही रमेश व रेखा मावस्कर हे दाम्पत्य शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत आहेत.

राष्ट्रपती भवनात जाण्यासाठी निघालेले रमेश मावस्कर यांच्याशी संवाद साधला असता एका प्रश्नाच्या उत्तरात रमेश मावस्कर म्हणाले की, भारताच्या प्रथम महिला आदिवासी राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांचेशी ता. २१ला होत असलेल्या भेटीत आपण त्यांना मेळघाटातील आरोग्य, शिक्षण व मूलभूत सुविधा वर चर्चा करणार आहे. त्यांना मेळघाट भेटीचे निमंत्रण देणार असल्याचे रमेश मावस्कर म्हणाले,. रमेश मावस्कर यांची ता. २१ला महामहीम राष्ट्रपती श्रीमती द्रौपदी मूर्मू यांचेशी मेळघाटातील समस्या व उपाय यावर चर्चा, संवाद होणार आहे. ते त्यांच्यासोबत भोजन करतील. रमेश मावस्कर यांनी मेळघाट च्या समस्या थेट राष्ट्रपती भवनात पोहचविणे हे मेळघाट च्या विकासाच्या पहाट ची नांदी ठरेल हा विश्वास यानिमित्ताने व्यक्त होत आहे.

रोजगारासाठी मेळघाटातील स्थलांतर ही मोठी समस्या येथे आहे. हातांना रोजगाराची साधने नाही कामे नाही... उपासमार होऊ नये यासाठी सहकुटुंब रोजगारासाठी मेळघाट सोडतो. कुटुंबातील सदस्यांमध्येशाळकरी मुले असतात.पालकांसमवेत रोजगार भटकंती करीत ही मुले शिक्षणाच्या प्रवाहापासून दुर जातात. अज्ञानी राहतात... ही व्यथा आदिवासींच्या चंद्रमौळी झोपडी कडे बघून मेळघाट कवी प्रकाश विंचूरकर यांच्या कवितेतून व्यक्त होते...

सावळ्या ढगातल्याओल्या सरीडोळ्यात दाटल्याझोपडीच्या व्यथार्थेबात विझल्याभुकेच्या ज्वाळा

असे अस्वस्थ वर्तमान मेळघाट'चे आज राष्ट्रपती भवनाकडे रमेश मावस्कर यांच्या पुढाकाराने जात आहे. 'मेळघाट' च्या या अस्वस्थ वर्तमानाला बदलविण्यासाठी नवा डिजीटल संपूर्ण मेळघाट निर्माण करण्यासाठी रमेश मावस्कर यांच्या रूपाने एक आशेचा किरण मेळघाटवासीयांना दिसतो आहे. विकासाची नवी पहाट मेळघाटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहे. राष्ट्रपती भवनातून आता मेळघाट चे चित्र पालटेल हा आशावाद रमेश मावस्कर यांच्या राष्ट्रपती भेटीमुळे दिसून येत आहे.

# वाठोडा शुक्लेश्वर येथे कृषी केंद्रांवर अधिकाऱ्यांची धाड

## शेतकऱ्यांना योग्य दरात युरिया व डीएपी खतांचे वितरण

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१ वाठोडा शुक्लेश्वर**

एक दिवस बळीराजासाठी या उपक्रमाअंतर्गत शेतकऱ्यांच्या तक्रारींची तत्काळ दखल घेत, भातकुली तालुक्यातील वाठोडा शुक्लेश्वर येथील पार्थ कृषी सेवा केंद्र व नवल कृषी सेवा केंद्रावर कृषी विभागाने अचानक धाड टाकली.

या केंद्रांवर युरिया व डीएपी खतांची अधिक दराने विक्री होत असल्याची तक्रार शेतकऱ्यांनी केली होती. यावर तात्काळ कारवाई करत कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित सेवा केंद्रांची तपासणी केली आणि शेतकऱ्यांना शासकीय दरात खतांचे वितरण करण्यात आले.

या कार्यवाहीत जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते, तालुका कृषी अधिकारी सागर इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी गुण नियंत्रण अधिकारी डी. एन. गाडगे, उप कृषी अधिकारी पी. एस. खर्चान, अमोल सराड आदी सहभागी झाले होते.

शेतकऱ्यांच्या हितासाठी शासन प्रतिबद्ध असून, कोणत्याही अनियमिततेस थारा दिला जाणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला.




# अवैध वाळूचे तीन ट्रॅक्टरसह एक ट्रक जप्त

## तिवसा महसूल विभागाची कारवाई

विदर्भ प्रजासत्ताक

**दि.२१तिवसा**

वाळूची अवैध वाहतूक करताना एकाच दिवशी नायब तहसीलदार यांच्या नेतृत्वातील पथकाने गस्तीवर असताना शनिवारी पहाटे तीन ट्रॅक्टर व एक ट्रक जप्तीची कारवाई केली. याकारवाईमुळे तालुक्यातील वाळू माफियांचे धाबे दणाणले आहे.

तिवसा महसूल हद्दीत येणाऱ्या चांदूर ढोरे, भारवाडी, उंबरखेड, जावरा यासह अनेक याठिकाणाहून गेल्या काही दिवसांपासून राजरोसपणे वाळूचा अवैध उपसा करून वाहतूक केली जात आहे.




दरम्यान पहाटे गस्तीवर असताना ट्रॅक्टरने वाळूची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती नायब तहसीलदार आशिष नागरे यांच्या पथकाला मिळाली.

यावेळी भारवाडी नदी घाटातून दोन, तर उंबरखेड घाटातून वाळूची वाहतूक करणारा एक ट्रॅक्टर जप्त करण्यात आला. तसेच मोझरीयेथील दासटेकडी मार्गावर कनान वाळूचा एक ट्रक पकडण्यात आला. ही कारवाई तहसीलदार डॉ. मयूर कळसे यांच्या मार्गदर्शनात नायब तहसीलदार आशिष नागरे, तलाठी स्वप्नील भुयार, चरणसिंग दुलत, नरेश माळोदे यांनी केली.

तिवसा महसूलकडून पहाटे चार वाजता दरम्यान तीन ट्रॅक्टर व एका ट्रकवर जप्तीची धडक कारवाई झाल्याने तालुक्यातील वाळू माफियांचे धाबे दणाणले असले तरी तालुक्यात सुरु असलेल्या वाळू माफियावर अंकुश लावण्यात स्थानिक मंडळ अधिकारी, तलाठी असमर्थ ठरत असल्याचे दिसून येत आहे.

# शहरात अवैध सर्पमित्रांचा सुळसुळाट

## वनविभागाची कुठलीच कारवाई नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती–** सर्पमित्र म्हणून शहरातील काही युवकांची ओळख आहे. परंतु काहीं तथाकथित सर्पमित्र केवळ प्रसिद्धीसाठी सापांसह स्वतःचाही जीव धोक्यात घालत असल्याचे समोर येत आहे. तसेच सापाला पकडतात आणि फोटो व व्हिडीओ काढून सोशल मीडियावर व्हायरल करतात. वनविभागाची अधिकृत मान्यता नसलेल्या अशा अवैध सर्पमित्रांमुळे सापांच्या नैसर्गिक वर्तनावर परिणाम होत आहे.अमरावती जिल्ह्यात किती सर्पमित्र आहेत, याची निश्चीत आकडेवारी वनविभागाकडे नाही. परंतू सर्पमित्र बनवून सापांशी खेळ खेळणाऱ्यांची संख्या आता दिवसेंदिवस वाढत आहे. अनेक तरुण सर्पमित्र म्हणून फेक आयडी, बनावट सर्टिफिकेट किंवा फक्त मोबाईल घेऊन जंगलात फिरताना दिसतात. साप पकडल्यावर त्याच्यासोबत फोटो काढणे, व्हिडीओ तयार करून इंस्टाग्राम, फेसबुकवर अपलोड करणे, हे एक 'फॅड' बनले आहे. यामुळे साप तणावग्रस्त होतात, त्यांचे हाल होतात आणि काही वेळा पकडताना त्यांच्या जीवावर बेतते. सर्पमित्र म्हणून काम करण्यासाठी वनविभागाकडून प्रशिक्षण आणि परवानगी आवश्यक असते. मात्र, अनेकजण ही परवानगी न घेता थेट सापांना पकडतात, फोटोसाठी सापांना बराच




वेळ सोबत ठेवतात आणि नंतर सोडतात. यामुळे त्यांच्या आरोग्यावर दुष्परिणामहोण्याची दाट शक्यता असते. दुर्दैव म्हणजे अशा घटनांकडे वनविभाग दुर्लक्ष करत असल्याचे चित्र आहे. पर्यावरण प्रेमी आणि सर्प अभ्यासक निलेश कंचनपुरे यांच्या मते, साप हा नैसर्गिक अन्नसाखळीतील अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्याच्यावर प्रसिद्धीसाठी प्रयोग करणे चुकीचेच नव्हे तर पर्यावरणविरोधीही आहे. यावर तातडीने कारवाई होणे गरजेचे आहे. वन्यप्राण्यांचे रक्षण करणाऱ्या कायद्यानुसार कोणत्याही वन्यप्राण्याला पकडणे, बाळगणे किंवा चित्रिकरण करणे हे वनविभागाच्या मान्यतेशिवाय बेकायदेशीर आहे. अशा प्रकारांवर शिक्षा आणि दंडाची तरतूद आहे.

# वढाळ गव्हाणची कु. प्रिती तायडे पोहचली टी-सिरीज मध्ये

## वडील नसतांना आई शेतमजुरी करणारी तिची जिद्द खरी ठरली

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२१दर्यापूर** दर्यापूर तालुक्यातील वढाळ गव्हाण या गावातील कु. प्रिती तायडे एका अत्यंत सामान्य कुटुंबातील, पण मोठं स्वप्न पाहणारी मुलगी. या गावातून असा उज्वल तारा उगम पावणं ही आपल्यासाठी अभिमानाची बाब आहे. आज ती आपल्या मेहनतीच्या, जिद्दीच्या आणि अफाट कलागुणांच्या जोरावर टी सिरीज सारख्या आघाडीच्या मंचावर पोहचली आहे. ही तिचीच नाही, तर आपल्या संपूर्ण दर्यापूर तालुक्याची शान आहे. तिचं यश म्हणजे गावागावात असलेल्या नवोदित कलाकारांना



मिळालेली आशेची नवी दिशा ! ती कुणा मोठ्या घरातली नाही... पण तिचं स्वप्न मात्र खूप मोठं आहे. आता आपली जबाबदारी आहे तिला साथ देण्याची:तिचे व्हिडीओ बघा,चॅनेलला डील–ीलीळलश करा,कमेंटमध्ये अभिप्राय व्यक्त करा,आणि हा संदेश शेअर करून दर्यापूरच्या या स्टारचा प्रकाश जगभर पोहचवा !दर्यापूर तालुक्यातील कलाकारांना साथ द्या, आपल्या मातीतील चमकत्या तार्याचा जिल्ह्याभरात सन्मान होत आहे.

# वरूडच्या उपजिल्हा रुग्णालयाला तृतीय क्रमांक

## साडेबारा हजार कार्यालयात हंड्रेड डेज मोहीम यशस्वी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१वरुड–** जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन, अमरावती येथे १९ जुलैला आयोजित राज्य विभाग, जिल्हा व तालुका स्तरांवरील एकूण १२ शासकीय कार्यालयांमध्ये यशस्वी हजार ५०० राबविण्यात आलेल्या मोहिमेसाठी अमरावती विभागामध्ये उपजिल्हा रुग्णालय या गटातून उपजिल्हा रुग्णालय, वरुड हे कार्यालय तिसरा क्रमांक व व तालुका वैद्यकीय आरोग्य अधिकारी कार्यालयला दुसरा क्रमाक मिळाला आहे.शंभर दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा विशेष मोहीम अंतर्गत जिल्हाधिकारी कार्यालय नियोजन भवन अमरावती येथे शनिवारी सत्कार समारंभ कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या हस्ते डॉ. प्रमोद पोतदार, डॉ. परिक्षित रामपूरे, डॉ. अमोल देशमुख यांचा सत्कार करण्यात आला.शासनाने १०० दिवसांच्या आरोग्य शिबीर कार्यक्रमाअंतर्गत उपजिल्हा रुग्णालय वरुडचा अमरावती महसूल विभाग अमरावती, अकोला, बुलढाणा, वाशिम, यवतमाळमधून तिसरा क्रमांक व वरुड तालुका आरोग्य अधिकारी कार्यालयाचा दुसरा क्रमांक आला. यासाठी आवश्यक असणाऱ्या शासन निर्देशानुसार शंभर दिवसांच्या कार्यक्रमासाठी रुग्णालयाचे प्रमुख सुविधा त्यामध्ये बाह्य रुग्ण विभाग, अंतर्गत रुग्ण विभाग, प्रयोगशाळा सेवा, औषधी विभाग, २४ तास आपातकालीन आरोग्य सेवा, शंभर दिवसांचे आरोग्य अभियान महाराष्ट्र शासन उद्दिष्टे क्षयरोग रुग्णांची लवकर निदान आणि उपचार करून मृत्यूदर कमी करणे, नवीन संसर्ग टाळणे, आयसीटीसी समुपदेशन, आणि चाचणी केंद्र कुटुंब नियोजन, प्रजनन आरोग्य सेवा, रोग सर्वेक्षण, नियंत्रण कार्यक्रम आरोग्य कर्मचारी विकास प्रशिक्षण सर्व आरोग्य जनजागृती उपक्रम राबविण्यात आले.

# गांजा घेऊन जाणारा आरोपी पसार, दोन किलो गांजा जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अमरावती–** कॉलेज बॅगमध्ये गांजा घेऊन जाणाऱ्या युवकाला थांबवताच तो बॅग सोडून पसार झाला. त्यामुळे पोलिसांनी २ किलो गांजा जप्त करून त्या युवकाचा शोध सुरु केला आहे. ही कारवाई रविवारी रात्री ९ वाजता नागपुरी गेट पोलिसांनी केली.नागपुरीगेट पोलीस गस्तीवर असताना ट्रॉन्सपोर्टनगर चौकातून एक युवक कॉलेज बॅगमध्ये मोठ्या प्रमाणात गांजा घेऊन जात असल्याची माहिती मिळताच पोलिसांनी परिसरातगस्त वाढविली. दरम्यान एक युवक कॉलेज बॅग घेऊन जाताना दिसताच पोलिसांनी त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. परंतु पोलिसांना पाहताच युवक बॅग सोडून पळून गेला. पोलिसांनी लगेच त्याचा पाठलाग केला परंतु तो हाती लागला नाही. त्यामुळे पोलिसांनी २ किलो गांजा जप्त करून युवकाचा शोध सुरु केला आहे.–

# संस्था चालकांनी बसवले नियम धाब्यावर

## सुनेलाच शालार्थ आयडी दिल्याच्या आरोप

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२१अंजनगाव सुर्जी**

कापूसतळणी येथील स्व. ना. शेंडे संजीवन विद्यामंदिर शाळेत संस्थाध्यक्ष व शिक्षण विभागाने अध्यक्षांच्या सुनेला बनावट शालार्थ आय. डी. देऊन बोगस नियुक्ती करीत शासकीय तिजोरीची लूट चालवली असून ही नियुक्ती बेकायदेशीर असल्याचा आरोप सेवानिवृत्त शिक्षक श्रीकृष्ण ठाकरे यांनी केला आहे. त्यामुळे शिक्षण विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



संजीवन विद्या मंदिराच्या संस्थाचालकाच्या सुनेला नियम धाब्यावर बसवून शिक्षण विभाग प्रमुखांनी बोगस नियुक्ती दिली. त्यांची २ मे २०१३ नंतर नियुक्ती करण्यात आली असून या भरतीसाठी शिक्षणाधिकाऱ्यांची र्वपरवानगी घेण्यात आली नाही,तसेच जाहिरात देताना बिंदुनामावली प्रमाणित केलेली न्हवती. बी. ए., बी. एड. ची पात्रता नमूद असूनही अनेक शिक्षक अतिरिक्त आहेत. जिल्ह्यातील विविध शाळांमध्ये परंतु, हे पद समायोजनाद्वारे भरण्यात आलेले नाही. विभागात पात्र अतिरिक्त शिक्षक उपलब्ध असताना त्यांच्या यादीची पडताळणी व खात्री न करता तसेच शाळा समिती व मुख्याध्यापका मार्फत ही नियुक्ती केल्या गेली नाही. त्यामध्ये सरकारी नियमांचे उल्लंघन झाल्याचा आरोप श्रीकृष्ण ठाकरे यांनी केला.शाळेने शिक्षणाधिकारी मान्यता प्रस्ताव व त्या सोबतचे (माध्य.) कार्यालयात सादर केलेले सर्व दस्तावेज बोगस असल्याचे माहीत असूनही आपल्या पदाचा दुरुपयोग करून संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाशी संगनमताने व आर्थिक गैरव्यवहार करून तत्कालीन शिक्षणाधिकाऱ्यांनी प्रथम शिक्षण सेवक व नंतर सहाय्यकशिक्षक म्हणून मान्यता दिली. त्यांची नियुक्ती बोगस व अवैध असल्यामुळे तत्कालीन शिक्षण उपसंचालक ए. एम. पेंदोर यांनी निकीता तिखिले यांचा शालार्थचा प्रस्ताव नाकारला होता. परंतु, त्यानंतर आलले शिक्षण उपसंचालक शिवलिंग पटवे यांनी शिक्षकेस बनावट व बोगस शालार्थ आय. डी. दिल्याचे म्हटले आहे.

■ संबंधितांनी संगनमताने शासनाची फसवणूक करून संस्थाध्यक्षकच्या सुनेला लाखो रुपयांचे वेतन देऊन शासकीय तिजोरीची हानी केलेली आहे. श्रीकृष्ण ठाकरे यांनी शिक्षण विभागास सदर मान्यता आदेश व शालार्थ आय. डी. रद्द करून संबंधितांकडून संपूर्ण वेतनाची वसुली व सर्व संबंधिताविरुद्ध फौजदारी कार्यवाही करण्याबाबत वारंवार तक्रारी केल्यावर शिक्षणाधिकारी प्रिया देशमुख यांनी उपशिक्षणाधिकारी अनिल कोल्हे यांना चौकशीचे आदेश दिले. मात्र अजुनपर्यंतही चौकशी झालेली नसल्याने यामध्ये दोषींना पाठीशी घालण्यासाठी प्रचंड मोठा आर्थिक व्यवहार झाल्याची शिक्षण विभागात चर्चा असून दररोज होणारे आरोप व घोटाळ्यांच्या गर्तेत सापडलेला शिक्षण विभाग कारवाई करणार की प्रकरण थंडबस्त्यात ठेवणार याकडे शिक्षण क्षेत्रात विविध चर्चा रंगत आहे.

■ **याबाबत स्व. ना. शेंडे संजीवनी विद्यामंदिराचे प्राचार्य योगेश उमक यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी त्याबाबत माझा त्या प्रकरणाशी कुठलाही संबंध नाही किंवा मला माहिती नाही असे सांगीतले.**

# सरकारच्या आश्वासनानंतरही बच्चू कडू असमाधानी का?

## दबावगट निर्माण करण्याचा बच्चू कडूंचा प्रयत्न...

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

शेतकरी कर्जमाफी आणि दिव्यांगांच्या प्रश्नांवर माजी राज्यमंत्री व प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष बच्चू कडू यांनी गेल्या महिन्यात केलेल्या अन्नत्याग आंदोलनादरम्यान सरकारने कर्जमाफीसाठी समिती गठित करण्याची घोषणा केली होती, त्यानुसार समिती स्थापन झाली. दिव्यांगांचे मानधन आता पंधराशे वरून अडीच हजार रुपये करण्यात आले, पण अजूनही बच्चू कडूंचे समाधान झालेले नाही.



जोपर्यंत कर्जमाफीसाठी ठोस भूमिका घेतली जात नाही, दिव्यांगांना सहा हजार रुपये मानधन मिळत नाही, तोपर्यंत संघर्ष सुरूच राहणार असल्याचे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे. बच्चू कडू यांनी येत्या २४ जुलैला राज्यभरात 'चक्काजाम' आंदोलनाची घोषणा केली आहे. या आंदोलनाला विविध पक्षांनी पाठिंबा जाहीर केला आहे. दबावगट निर्माण करण्याचा बच्चू कडूंचा प्रयत्न आहे.राज्य सरकारने कर्जमाफीसाठी समिती गठित केली असून, त्यासंदर्भात कामही सुरू झाले आहे. कर्जमाफीसाठी पात्र शेतकऱ्यांचे सर्वेक्षण केले जाणार आहे. निकष, अटी पूर्ण करणाऱ्या शेतकऱ्यांनाच कर्जमाफी दिली जाणार आहे. या समितीत बच्चू कडू यांचाही समावेश राहील, अशी भूमिका महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी मांडली आणि बच्चू कडूंनी कर्जमाफीबाबत सरकारला थोडा वेळ द्यावा, असे आवाहनही केले. बच्चू कडूंच्या मागण्यांविषयी सरकार सकारात्मक आहे. दिव्यांगांचे मानधन पंधराशे वरून पंचवीसशे रुपये करण्यात आले आहे. शेतकरी कर्जमाफीच्या दिशेने सरकारने ठोस पावले उचलली असल्याचा दावा बावनकुळे यांनी केला.

बच्चू कडू मात्र सरकारच्या भूमिकेवर अजूनही संतुष्ट नाहीत. कर्जमाफीसाठी सरकारने समिती नेमली असली, तरी त्यातून कोणताही अर्थबोध होत नाही. समिती ही कर्जमाफीसाठी आहे की उपाययोजनांसाठी, हेच कळत नाही. त्यामुळे जोपर्यंत कर्जमाफीसंदर्भात ठोस भूमिका घेतली जात नाही, कर्जमाफीची तारीख सांगितली जात नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचे बच्चू कडू यांचे म्हणणे आहे.

# राष्ट्रसंतांनी भजनांतून राष्ट्रभक्ती रुजवली- गडकरी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१तिवसा

खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित विदर्भस्तरीय खंजिरी, भजन स्पर्धेचा समारोप नागपूर येथे केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला. या स्पर्धेत गुरुकुंज आश्रम येथील स्वर गुरुकुंजाचे भजन मंडळाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची उत्कृष्ट भजने सादर करत प्रथम क्रमांक पटकावला. मंडळाला एक लाख रुपयांचा पुरस्कार, शाल श्रीफळ व मानचिन्ह प्रदान करण्यात आले.

या वेळी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी म्हणाले की, राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी खंजिरी, भजनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात नागरिकांचे प्रबोधन केले. समाज परिवर्तन केले. राष्ट्राचे पुनर्निर्माण करण्यासाठी राष्ट्रभक्ती रुजवण्याचे काम केले.



राष्ट्रसंतांसारखे संत या विदर्भाला लाभले हे विदर्भाचे भाग्य आहे. नागपूर येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात आयोजित कार्यक्रमाला अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवामंडळाचे सरचिटणीस जनार्दनपंथ बोथे, अंजनगाव सुर्जी येथील देवनाथ मठाचे जितेंद्रनाथ महाराज, नागपूर विद्यापीठाच्या अध्यासन प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी धोटे, हेमंत काळमेघ, अनिल सोले, ज्ञानेश्वर रक्षक, अशोक यावले यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

विदर्भस्तरीय खंजिरी भजन स्पर्धेची सुरुवात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांची प्रतिमा पूजन व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. या वेळी २८० स्पर्धक या स्पर्धेत सहभागी झाले. त्यात ३१ भजन मंडळाची अंतिम स्पर्धेसाठी नियुक्ती केली. यातील महाअंतिम फेरीत गुरुकुंज आश्रमातील स्वर गुरुकुंजाचे भजन मंडळ, (गुरुकुंज मोझरी) यांनी प्रथम क्रमांक एक लाखाचे बक्षीस मिळवून महाविजेता ठरले. खासदार सांस्कृतिक महोत्सव समितीतर्फे आयोजित खंजिरी भजन स्पर्धेसाठी मानव सेवा छायाचित्रालयाचे अधीक्षक अमोल बांबल व सहकाऱ्यांनी याकरिता परिश्रम घेतले.

# पिकांची दखल घेत शासन देणार परितोषिक शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१अमरावती

शेतकऱ्यांकडून खरीप हंगामात घेण्यात येणाऱ्या पिकांची दखल आता शासनाकडूनही घेण्यात येणार आहे.त्यात शेतकऱ्यांनी मेहनतीने पिकवलेल्या चांगल्या पिकांना परितोषिक देण्यासाठी राज्यांतर्गत अन्नधान्य, कडधान्य व गळीत धान्य पिकांच्या पीक स्पर्धा खरीप हंगाम २०२५ साठी आयोजित करण्यात आल्या आहेत. या पीक स्पर्धेत अधिकाधिक उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांना राज्यस्तर, जिल्हास्तर आणि तालुकास्तरीय बक्षीस मिळणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांनी खरीप हंगाम पीक स्पर्धेत मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्यामध्ये पिकांची उत्पादकता वाढविण्यासाठी विविध भागांमध्ये शेतकऱ्यांकडून विविध प्रयोग करण्यात येतात. या प्रयोगशील शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळावे, त्यांचे मनोबल वाढून



अधिक अपेक्षेने नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर व्हावा, त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, या उद्देशाने कृषी विभागामार्फत पीक स्पर्धा योजना हाती घेण्यात आली आहे.

या तारखेपर्यंत करावा अर्ज मूग, उडीद पिकांसाठी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ३१ जुलै असून धान, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, सोयाबीन, भुईमूग, व सूर्यफूल या पिकांसाठी ३१ ऑगस्टपर्यंत अर्ज दाखल करता येणार आहेत. रब्बी हंगामासाठी ज्वारी, गहू, हरभरा, करडई व जवस पिकांसाठी ३१ डिसेंबरपर्यंत अर्ज दाखल करता येईल.

**स्पर्धेत या पिकांचा समावेश**

तांदूळ, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी. २. कडधान्य : हरभरा, तूर, मूग, उडीद, मसूर, वाटाणा, मटकी, चवळी, सोयाबीन, कुळीथ. ३. गळीतधान्य : सोयाबीन, जवस ३ (अळशी), तीळ, करडई, मोहरी, सूर्यफूल, भुईमूग.

# बलात्कार प्रकरणातील आरोपीची पायी कोर्टवारी

## पोलिसांनी नेवासा येथून दोन महिन्यांनंतर पकडले



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१दर्यापूर

अल्पवयीन मुलीवर अत्याचार करून पसार झालेल्या आरोपीला दर्यापूर पोलिसांनी दोन महिन्यांनंतर अटक केली. अल्पवयीन मुलीवर दुष्कृत्य करणाऱ्या या आरोपीचा खरा चेहरा दर्यापूर पोलिसांनी आगळ्यावेगळ्या माध्यमातून सर्वसामान्यांसमोर आणला. पोलिसांनी रविवारी या आरोपीला अक्षरशः मुख्य मार्गाने पायी फिरवत स्थानिक न्यायालयात नेले होते. नटवर कैलाससिंग तोमर (२६, रा.लेहगाव, दर्यापूर) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्याविरुद्ध दर्यापूर पोलिसांत १२ मे २०२५ रोजी बलात्कार तसेच पोस्को कलमान्वये गुन्हा दाखल झाला आहे. मात्र गुन्हा दाखल झाल्यापासून तो पोलिसांना सातत्याने चकमा देत होता. त्याच्या शोधासाठी दर्यापूर पोलिसांनी आजूबाजूच्या जिल्ह्यातील पोलिसांनाही माहिती दिली होती. मात्र तो काही पोलिसांच्या हातात येत नव्हता. दरम्यान अथक प्रयत्नांनंतर त्याला अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा येथून दर्यापूर पोलिसांनी अटक केली आहे. पोलिसांनी त्याला भर रस्त्याने पायी फिरवत न्यायालयात नेल्यामुळे या आरोपीचा चेहरा नागरिकांसमोर आला. त्याला न्यायालयात नेतेवेळी ठाणेदार सुनील वानखडे यांच्या मार्गदर्शनात एपीआय अभय चौधनकर, पीएसआय नम्रता राठोड, रोहित सोनटक्के व अन्य पोलिस अंमलदार उपस्थित होते.

# चाचणी अंकेक्षणाला प्रारंभ शिक्षक बँक संचालकांची धावाधाव

विदर्भ प्रजासत्ताक
दि २१अचलपूर

अचलपूर चाचणी अंकेक्षणाला प्रारंभ झाल्यामुळे शिक्षक बँक संचालकांची धावाधाव सुरू झाली आहे. सदर अकेक्षण थांबले पाहिजे, अन्यथा मोठी आर्थिक तसेच अन्य बँकिंग प्रकारची अनियमितता झाल्याचे पुढे येईल, ही धास्ती बँकेच्या संचालकांनी घेतल्याचे सदर धडपडीवरून दिसून येत आहे.





शिक्षक सहकारी बँक विभागीय झाल्यापासून अमरावती व्यतिरिक्त यवतमाळ, अकोला, वाशिम आदी ठिकाणी बँकेच्या शाखा सुरू करण्यात आल्या आहेत. प्राप्त माहितीनुसार नव्याने सुरू झालेल्या शाखावर मोठ्याप्रमाणात कर्जवाटप झालेले आहे. अन्य सरकारी वा खाजगी बँकेत थकीत असलेल्या कर्जदारांना नव्याने सुरु झालेल्या शिक्षक बँकेच्या बाहेर जिल्ह्यातील सभासदांना लाखो रुपयांचे कर्ज वाटली आहे.उल्लेखनीय म्हणजे आधीच कर्जाच्या ओझ्याखाली दबलेल्या सदर कर्जदारांनी शिक्षक बँकेचे नियमित हप्ते भरले नाही. पर्यायाने ते ३१ मार्चच्या स्थितीवर थकीत दिसू लागले. ही बाब बँकेच्या आर्थिक स्थितीला धक्का देऊ शकते. या भीतीपोटी बँकेच्या प्रशासनाने थकीत कर्जदारांच्या कर्जाचे जादा कर्ज देऊन पुनर्गठन केले. सदर पुनर्गठन केल्याने बँकेची आर्थिक स्थिती सुधारल्याचा फुगा फुगल्याचे दिसत असले तरी ज्यांची कर्ज भरण्याची ऐपत नाही, अशांना वाढीव कर्ज दिल्याने आर्थिक सुधारणेचा फुगलेला फुगा भविष्यात फुटेल आणि एनपीएचे प्रमाण अधिक वाढेल, अशी भीती सभासदांना भेडसावत आहे.तसेच कर्जदारांना कर्जवाटप करताना आवश्यक कागदपत्रांची तपासणी केली का, अन्य बँकांचे कर्ज नसल्याचे प्रमाणपत्र जोडले का. पगार आणि कर्ज या अनुपाताततो बसतो का, नव्याने पुनर्गठन केलेले कर्जदार कर्जाचे हप्ते नियमित भरतात का, यासह अनेक बाबीचे चाचणी अंकेक्षणाला मागील काही दिवसापासून सुरुवात झाली आहे. प्राप्त माहितीनुसार मोर्शी, चांदूरबाजार येथे ऑडिटरच्या टीमकडून चाचणी अंकेक्षण करण्यात आले. उर्वरित तालुक्यात लवकरच टीम पोहोचणार असल्याचे संकेत आहेत.मागील काही दिवसांपासून शिक्षक बँकेचे चाचणी अंकेक्षण सुरू आहे. मुख्यालय आणि तालुका शाखांची पडताळणी सुरु आहे. अध्यक्ष गोकुळदास राऊत यांच्या मोर्शी शाखेपासून ऑडिटचा श्रीगणेशा झाल्याचे कळते, तर चांदूरबाजार शाखेवरही ऑडिटर यांनी तपासणी केल्याचे कळते बोगस कर्ज पुनर्गठन यासह अनेक मुद्द्यांचे ऑडिट केले जाणार असल्याचे समजते. २ कोटी रु. चा धनादेश गहाळ प्रकरण अत्यंत गंभीर असल्याने या प्रकरणीसुद्धा तपासणी केली जात आहे. उल्लेखनीय म्हणजे एवढी मोठी चूक झाली, काही कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल होऊन त्यांना अटकही झाली आहे: मात्र यात महत्त्वाचा सहभाग असणाऱ्या कर्मचाऱ्यांना वाचविण्यात आले आहे. ही बाब बँकिंग क्षेत्रासाठी अतिशय लाजीरवाणी असल्याचे बोलले जात आहे. त्याचप्रमाणे इनोव्हा प्रकरणही अतिशय गंभीर आहे. इनोव्हा गाडी विकत घेतल्यानंतरती बँकेच्या नावाने नव्हे तर परतवाडा येथील एका प्रतिष्ठित डॉक्टरच्या नावे करण्यात आली.सदर गाडी अनेक वर्षे बोगसपणे वापरली. अध्यक्ष गोकुळदास राऊत आणि काही संचालक मुंबई येथे गेले असता सदर गाडी समुद्राच्या काठावर एका बीचच्या बाजूला नो पार्किंग झोनमध्ये पार्क केली असता मुंबई पोलिसांनी पकडल्यानंतर ती गाडी बोगस असल्याचा छडा लागला. एवढ्या विभागीय बँकेच्या अध्यक्षासाठी असलेली लक्झरी गाडी अन्य कोणाच्या नावे असावी, याचे भानही त्यांना राहिले नाही. त्यानंतर याप्रकरणी बँकेला दंड झाला असल्याची माहिती आहे. याही बाबींवर ऑडिटर प्रकाश टाकणार आहे.बँकेचे अशाप्रकारचे ऑडिट पहिल्यांदाच होत आहे. शासकीय ऑडिटमध्ये दूध का दूध आणि पाणी का पाणी होत असल्याने सदर ऑडिटला स्थगिती मिळावी, यासाठी बँकेच्या संचालकांची धावाधाव सुरु आहे. कधी राजकीय नेते तर कधी शासकीय अधिकारी यांच्याशी संपर्क सुरु आहे. मंत्रालयात 'स्टे' मिळावा यासाठी सहकार मंत्र्यांकडे याचिका दाखल करण्यात आली होती: मात्र सदर याचिका फेटाळल्याची माहिती आहे. यानंतर आता बँक उच्च न्यायालयात जाणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. कोणत्याही परिस्थित चाचणी ऑडिट होऊ नये, यासाठी बँकेने सर्व हातखंडे वापरले आहे. वास्तविक बँकेचे कार्य पारदर्शक आहे, तर मग बँकेने चाचणी ऑडिटला घाबरण्याची गरजच काय, असे सहकार वर्तुळात बोलले जात आहे. ऑडिट होऊच नये यासाठी पळापळ करणे म्हणजे काहीतरी मोठे घबाड आहे, असे चर्चेमध्ये बोलले जात आहे.

'हम करे सो कायदा' अशाप्रकारे सहकाराला तिलांजली देत स्वाहाकार करण्यात संचालक मंडळ गुंतलेले आहे. अशा परिस्थितीत सभासद हिताकरिता आणि भ्रष्टाचाराला आळा घालण्याकरिता आमचा प्रयत्न कायम राहील. यापुढेही अनेक प्रश्नांना वाचा फोडली जाईल. अशी प्रतिक्रिया प्रभाकर झोड यांनी दिली.

# दहा दिवसांपासून पावसाने फिरविली पाठ

## कडक उन्ह तापत असल्याने शेतकरी चिंतेत

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१ अंजनगाव सुर्जी:

गेल्या आठ ते दहा दिवसांपासून तालुक्यात पाव प्रने दांडी मारली आहे. त्यातच कडक उन्ह तापत असल्याने पिके परिपक्व होण्याच्या आधीच फुलधारणा होत असल्याने शेतकऱ्यांसमोर चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावर्षी पावसाने सुरुवात चांगली केली. पेरणीयोग्य पाऊस झाल्यानंतर अल्पावधीतच सोयाबीन, कपाशी, तूर या पिकांची पेरणी शेतकऱ्यांनी केली. जुलै महिन्याच्या सुरुवातीला पिकाच्या वाढीसाठी योग्य असलेला पाऊस आल्याने यावर्षी पिके



चांगली राहतील आणि उत्पन्नही चांगले होईल, अशी आशा शेतकऱ्यांना होती. मात्र, ११ जुलै पासून पावसाने साफ दांडी मारली. त्यातच कडक उन्हतापत असल्याने शेतकऱ्यांच्या चिंतेत वाढ झाली आहे. सुरुवातीच्या तीन-चार दिवसांत पिकांची आंतरमशागत शेतकऱ्यांनी केली. परंतु, आता आंतरमशागतीची कामेही आटोपली असून शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत. तर काही शेतकरी सोशल मीडियावरच्या हवामान तज्ज्ञांच्या हवामानाचा अंदाज घेत आज पाऊस नक्की येणार, असे बोलताना दिसत आहेत, तर कुठे निसर्गाच्या पुढे काही नाही, अशी हतबलता शेतकरी व्यक्त करीत असल्याने पुन्हा लहानपणीच्या 'ये रे ये रे पावसा' या गीताची आठवण होत आहे.

# शेतकरी झाला हवालदिल : हुमणी अळीच्या प्रकोपाने चार एकरातील सोयाबीन वाळले

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२१नांदगाव खंडेश्वर :

तालुक्यातील वेणी गणेशपूर येथील शेतकरी रोशन नारायण बंड यांच्या मालकीच्या चार एकर शेतातील सोयाबीनचे पीक हुमणी अळीच्या प्रकोपाने सरासरी ९० टक्के वाळले असल्याने शेतीला लागलेला खर्च वाया गेला. त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला. तेव्हा या समस्येची तालुका कृषी विभागाने दखल घेऊन प्रत्यक्ष पाहणी करावी व शासनाकडून आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी रोशन बंड या शेतकऱ्यांकडून करण्यात आली.मौजा वेणी गणेशपूर शिवारात या शेतकऱ्याचे चार एकर शेत आहे. या शेतामध्ये २५ जूनला सोयाबीन व तूर या पिकाची पेरणी केली होती.



पेरणी नंतर पीक जोमदार उगवले: परंतु काही दिवसांनी सोयाबीनचे झाडे सुकलेल्या अवस्थेत दिसून आली असल्याने यावर्षी पावसाचे प्रमाण या परिसरात फारच अल्प असल्याने पीक सुकत आहे, असा समज या शेतकऱ्यांचा झाला' व त्यांनी सोयाबीनला स्प्रिंकलरद्वारे पाणी दिले असता झाडे सुकणे थांबली नाही, उलट आठ दिवसातच शेतातील ९० टक्के सोयाबीन वाळून गेले आणि तुरीचे पीकही वाळून जात असल्याने अखेर दोन एकर शेतामधील पिकामधूनत्याने वखर फिरवला असता अळ्या मोठ्या प्रमाणात आढळून आल्या. तेव्हा हुमणी अळीचा प्रकोप फार मोठ्या प्रमाणात असल्याचे दिसून आले.या परिसरात ही समस्या इतरही काही शेतकऱ्यांच्या शेतामध्ये अल्प प्रमाणात असल्याची माहिती आहे. हुमणी अळी जमिनीच्या आत राहून पिकांच्या मुळा खाऊन टाकतात, त्यामुळे झाड निर्जीव होऊन वाळून जाते. तेव्हा शेतकऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. कृषी विभागाने या शेताची प्रत्यक्ष पाहणी करून या समस्येवर प्रतिबंधित उपाययोजनासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. हल्ली शेतकरी अनेक समस्यांनी वेढला असून हवालदिल झाला आहे

हुमणी अळीच्या प्रकोपाने माझ्या ४ एकर शेतातील ९० टक्के सोयाबीन वाळले. त्यामुळे २ एकर शेत मी वखरलेसुद्धा उर्वरित शेत कृषी अधिकारी यांचे पाहणीकरिता वखरले नाही कर्ज काढून मी यावर्षी शेतामध्ये पेरणी केली. सोयाबीन सुकल्यामुळे शेतीवर झालेला खर्च वाया गेला लाखो रुपयांचे नुकसान झाले, मला एक रुपयाचेसुद्धा उत्पन्न या शेतीतून मिळत नाही तेव्हा कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा करावा, या विवंचनेत आहो. कृषी विभागाने पाहणी करून शासनाकडून मला मदत मिळून द्यावी.


**रोशन बंड, शेतकरी, वेणी गणेशपूर**

# बिबट्याचा संचार; नागरिक भयभीत

## वन विभागाने लावले नागरी वस्तीत पिंजरे

विदर्भ प्रजासत्ताक दि.२१अमरावती

विद्यापीठ ते मार्डी मार्गालगतच्या नागरी वस्तीत गत काही दिवसांपासून दोन बिबट्यांनी धुमाकूळ घातला आहे. सावज शोधण्यासाठी ते रात्री-अपरात्री जंगलातून या भागात धाव घेत असल्याने नागरिक भयभीत झाले आहेत. त्या पार्श्वभूमीवर वन विभागाने नागरी वस्तीत येणाऱ्या बिबट्याच्या मार्गावर पिंजरे लावले आहेत. मात्र, तरीही बिबट पिंजऱ्यात हुलकावणी देत श्वानाची शिकार करीत असल्याची माहिती आहे.संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ,तपोवन, मार्डी मार्गालगतची नागरी वस्ती, मासोद आदी भाग हा जंगलालगत आहे. त्यामुळे या परिसरात बिबट्याचे वास्तव्य आहे. तसेच विद्यापीठाच्या



आतील भागातसुद्धा बिबट्याचे अनेकदा दर्शन झाले आहे. सावज शोधण्यासाठी जंगलातून बिबट्याचे या भागात येणे ही नित्याचीच बाब आहे. परंतु, मार्डी मार्गालगतच्या नागरी वस्तीत नागरिकांना सतत बिबट दिसून येत असल्याने ते प्रचंड दहशतीत आले आहेत. घराच्या अंगणात येऊन बिबट श्वानाची शिकार करीत असल्याने तो कधीही मनुष्यावर हल्ला करू शकतो, अशी भीती वर्तविली जात आहे. त्यामुळे वन विभागाने या परिसरात पिंजरे लावले आहेत.

# वनविभागात 'आयएफएस' पदांचा खेळ; आता ८ पीसीसीएफ वनसंरक्षक पदाला कात्री आणि बदल्यांमध्ये सोय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

राज्याच्या वन विभागात भारतीय वनसेवेतील (आयएफएस) अधिकारी सोईनुसार पदे निर्माण करून हव्या तशा पोस्टिंग मिळवित असल्याचे वास्तव आहे. वनविभागात आता आठ प्रधान मुख्य वनसंरक्षकांची पदे झाली असून, वनसंरक्षक हे पद हद्दपार करण्यात आले आहे. नियमांना छेद देत मर्जीनुसार पदे निर्माण केले जात आहे.




महसूल व वनविभागाने १७ जुलै रोजी आयएफएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांची यादी जारी केली आहे. या पदस्थापनेच्या यादीत गत काही वर्षांपूर्वी हरिसाल येथील आरएफओ दीपाली चव्हाण यांच्या आत्महत्याप्रकरणी नाव आलेले एम. श्रीनिवास रेड्डी यांना प्रधान मुख्य वनसंरक्षक म्हणून बढती मिळाली आहे.

गेल्या तीन वर्षांपासून अर्थ व नियोजन विभागात ठाण मांडून बसलेले कल्याणकुमार यांना हलविण्यात आले आहे.तर, बदली यादीनुसार आयएफएस लॉबी राज्य शासनाला जुमानत नसल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले आहे.जी पदे आयएफएस दर्जाची नाही, अशा ठिकाणी पदे निर्माण करून राज्य सेवेतील वन अधिकाऱ्यांच्या पदावर संक्रांत आणली आहे. मराठी आयएफएस अधिकाऱ्यांना बदल्यांमध्ये दुय्यम स्थान दिले जात असल्याने वनविभागात शीतयुद्धाची शक्यता बळावली आहे.

**वनसंरक्षकांची पदे हद्दपार**

उपवनसंरक्षक यानंतर वनसंरक्षपदाची साखळी वनविभागात तुटल्याची दिसून येते. कारण, सामाजिक वनीकरणात अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, संचालक कुंडल (सांगली) या उपवनसंरक्षक दर्जाच्या पदावर आयएफएस देण्यात आले आहे. तर यवतमाळ प्रादेशिकमध्ये मुख्य वनसंरक्षकाचे पद निर्माण करण्यात आले आहे. सध्या 'सीएफ' हे पद गुंडाळण्याचे काम सुरू झाले आहे. वन प्रशासन अकादमी कुंडल (सांगली) येथे दोन आयएफएस जागा निर्माण करण्यात आल्या आहेत.

**मराठी अवॉर्ड आयएफएस साइडला**

दीड महिन्याच्या कालावधीनंतर विभागीय वनाधिकाऱ्यांना आयएफएस पोस्टिंग देण्यात आली. यामध्ये २२ मराठी आयएफएस अधिकाऱ्यांना साइड पोस्टिंग दिली असून, योगेश वाघाये, राम धोत्रे व मोहन नायकवाडी या केवळ तीन अधिकाऱ्यांना प्रादेशिक विभाग मिळाले आहे. १९ अधिकाऱ्यांना साइड पोस्टिंगवर समाधान केले आहे. त्यामुळे डायरेक्ट आयएफएस आणि अवॉर्ड आयएफएस असा भेदाभेद केल्याची भावना निर्माण झाली आहे.

## अभिष्टचिंतन सोहळा...



अमरावती शहरातील ख्यातनाम सामाजिक कार्यकर्ते आणि हॉटेल न्यू ईगल रेस्टॉरंटचे संचालक रवींद्रसिंग सलुजा उर्फ बिट्टू सेठ यांच्या वाढदिवसानिमित्त, अमरावती प्रेस फोटोग्राफर असोसिएअशन च्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. संघटनेचे पदाधिकारी आणि सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन सलुजा यांना वाढदिवसाच्या मन:पूर्वक शुभेच्छा दिल्या. यावेळी उपस्थित सर्वांनी सलुजा यांना पुढील सामाजिक वाटचालीसाठी यश, उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभो, अशा सदिच्छा व्यक्त केल्या.नेहमीच सामाजिक कार्यात अग्रेसर राहणाऱ्या सलुजा यांचा वाढदिवस यंदाही सद्भावना आणि आदरपूर्वक साजरा करण्यात आला.



## म.रा. मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचे धरणे आंदोलन अन्यायकारक बदल्या, गोपनीय अहवाल आणि भेदभावाविरोधात आंदोलन उभारले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेच्या वतीने महावितरणच्या अमरावती परिमंडळ कार्यालयासमोर आज तीव्र धरणे आंदोलन करण्यात आले. मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर सातत्याने होणाऱ्या अन्यायकारक बदल्या, दुर्लक्षित अर्ज, आणि गोपनीय अहवालांमध्ये हेतुपुरस्सर त्रुटी नोंदवल्याच्या विरोधात हे आंदोलन करण्यात आले.संघटनेचा आरोप आहे की इतर संघटनांचे सदस्य प्रशासनाच्या पाठबळाने सोयीस्कर बदल्या मिळवतात, तर मागासवर्गीय कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे. लाचलुचपत प्रकरणांमध्येही काहींना संरक्षण दिले जात असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणले.जर प्रशासनाने यावर तात्काळ सकारात्मक पावले उचलली नाहीत, तर येत्या काळात साखळी उपोषण करण्यात येईल.यावेळी राहुल सांभारे (केन्द्रीय उपाध्यक्ष), रत्नदीप तायडे (परिमंडळ सचिव), मिलिंद भगत (मंडळ सचिव), निखीलेश गजभिये (मंडळ अध्यक्ष), तसेच धम्मपाल राजगुरे, धर्मपाल स्थूल, राहुल ढोके, दीपक हांडे यांची उपस्थिती होती.

## औद्योगिक वसाहतीत कृषी विभागाची कारवाई; २१.९५ लाखांचा साठा जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. २१अकोला**

मुदतबाह्य कीटकनाशके नव्या बाटलीत टाकण्याचा गोरखधंदा अकोल्यातील औद्योगिक वसाहत परिसरात सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार कृषी विभागाच्या छाप्यात उघड झाला आहे. मुदतबाह्य कीटकनाशके नव्या बाटलीत टाकून शेतकऱ्यांची फसवणूक करण्याचा घाट घातला जात होता. कृषी विभागाने टाकलेल्या छाप्यामध्ये तब्बल २२ लाख रुपयांचा साठा जप्त करण्यात आला.

खरीप हंगामाची पेरणी आता अंतिम टप्प्यात आली आहे. यावर्षी जून व जुलै महिन्यात दमदार पावसाने हजेरी लावली. सुरुवातीच्या काळात पेरणी केलेल्या अनेक शेतकऱ्यांचे पीक चांगले उगवले आहे. गेल्या आठवड्यापासून पावसाने दडी मारली. दरम्यान, पिकावर विविध प्रकारची रोगराई येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

या सर्व पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांकडून पिकांवर कीटकनाशकांची फवारणी केली जाते. कीटकनाशके खरेदी करण्यासाठी बाजारपेठेत शेतकऱ्यांची गर्दी होऊ लागली आहे. दरम्यान, अकोल्यातील औद्योगिक वसाहत परिसरात एक धक्कादायक प्रकार समोर आला. मुदतबाह्य कीटकनाशके बॉटल फोडून नव्या बॉटलमध्ये टाकत असतानाचा धक्कादायक प्रकार व्हि.जे. क्रॉप सायन्स प्रायव्हेट लिमिटेड कंपनीच्या ठिकाणी उघडकीस आला. या ठिकाणी अकोला जिल्हा कृषी विकास अधिकारी तुषार जाधव यांच्या भरारी पथकाने कारवाई केली.

मुदतबाह्य कीटकनाशकांचा मोठ्या प्रमाणात साठा होता. या साठ्याची विक्री करण्याच्या दृष्टिने नवीन पॅकिंग केलेल्या बाटल्यांमध्ये ते भरले जात असल्याचे आढळून आले आहे. या ठिकाणी उपस्थित कर्मचारी व मजूर वर्गाकडून मुदतबाह्य कीटकनाशके बॉटल फोडून ती कीटकनाशके नवीन बॉटलमध्ये टाकणे, त्याचे वजन करणे व त्यावर नवीन बॅच क्रमांक व उत्पादन दिनांक नवीन स्टीकर लावणे, असे नियमबाह्य प्रकार सुरू होते.

कीटकनाशके कायद्यांतर्गत कृषी विभागाने कारवाई करून मुदतबाह्य कीटकनाशकांचा २१ लाख ९५ हजार रुपयांचा साठा पथकाने जप्त केला आहे. कृषी विभागाच्या पथकाने घटनास्थळावरून आठ कीटकनाशकांचे नमुने घेतले. ते तपासणीसाठी प्रयोगशाळेत पाठवण्यात आले आहेत. या नमुन्यांचा तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर पुढील कारवाई केली जाणार असल्याचे कृषी विभागाकडून स्पष्ट करण्यात आले.

## शिक्षकांना नियमित केले, परंतु आदेश तात्पुरते राहिले, तासिका व रोजंदारीवरच दिल्या नियुक्त्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात शासकीय आदिवासी आश्रमशाळांतील तासिका तत्त्वावरील शिक्षक व रोजंदारी कर्मचाऱ्यांचा विषय विरोधी पक्षाकडून १५ जुलै रोजी सभागृहात आल्यानंतर ६६४ तासिका शिक्षक व रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित केल्याचा दावा आदिवासी विकास मंत्री प्राचार्य डॉ. अशोक उईके यांनी सभागृहात केला. परंतु, प्रत्यक्षात तासिका शिक्षकांच्या सेवा नियमित केल्या नसून, त्यांना तासिका व रोजंदारीवरच नियुक्त्या दिल्याची धक्कादायक बाब पुढे आली आहे. त्यामुळे आदिवासी विकास मंत्र्यांनी विधिमंडळ सभागृह आणि उमेदवारांची फसवणूक केल्याची चर्चा आता रंगू लागली आहे.




गत १३ ते १४ दिवसांपासून नाशिक आयुक्तालयासमोर आश्रमशाळांतील बाह्यस्त्रोताद्वारे भरती प्रक्रिया रद्द करा व तासिका शिक्षक, रोजंदारी कर्मचाऱ्यांना नियमित करण्याच्या मागणीसाठी आंदोलन सुरू आहे.

**२ हजार ६०० शिक्षकांना पाठवले घरी**

'ट्रायबल'ने शासकीय आदिवासी आश्रम शाळांमध्ये १ हजार ७९१ पदे बाह्यस्त्रोताद्वारे भरती करण्याचा शासन निर्णय २१ मे २०२५ रोजी निर्गमित केला आहे. त्यामुळे ४४९ आश्रमशाळांतील तासिका व रोजंदारीवरील सुमारे २ हजार ६०० शिक्षकांना घरी पाठवले आहे.

शाळा चालू होऊन महिना झाला आहे. अद्यापही आदिवासी विद्यार्थ्यांना अध्यापनासाठी शिक्षक मिळाले नाही. आदिवासी विकास विभागाने नियुक्त्या केलेल्या नाही, हे वास्तव आहे. आता मात्र ज्यांच्या सेवा १० वर्षे झाल्यात अशा ६६४ तासिका शिक्षक, रोजंदारी कर्मचारी यांना आदिवासी मंत्र्यांनी सभागृहात नियमित केल्याचे सांगून शुद्ध फसवणूक केलीच; पण तासिका शिक्षक व रोजंदारीवरील कर्मचारी पात्रताधारक नाहीत. त्यांची बाजू घेऊ नका, असेही मंत्र्यांनी सभागृहात आवाहन केले. परंतु बहुतांश उमेदवार उच्च शिक्षित असून पात्रता परीक्षा उत्तीर्ण आहेत.

**शासनाचे ५० कोटींचे नुकसान**

तासिका व रोजंदारीवर असलेल्या २ हजार ६०० शिक्षकांच्या वेतनावर वार्षिक अंदाजे ३५ कोटी रुपयांचा खर्च होत आहे. बाह्यस्त्रोताद्वारे १७९१ शिक्षक भरतीसाठी ८४ कोटी ७४ लाख ५५ हजार रुपयांच्या कंत्राटाला मंजुरी दिलेली आहे. यात ५० कोटी रुपये कोणाच्या घशात घालणार आहे. बाह्यस्त्रोताची भरती ही प्रक्रियेतच अडकली आहे.

**कोर्टात अवमान याचिकांचा पाऊस**

मुंबई उच्च न्यायालयाने शासकीय आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहामध्ये दहा वर्षे सेवा पूर्ण केलेल्या रोजंदारी आणि तासिका तत्त्वावरील शिक्षक, कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेण्याचे आदेश १४ ऑक्टोबर २०२४ व १४ नोव्हेंबर २०२४ रोजी दिले होते.

या कार्यवाहीसाठी १८० दिवसाची मुदतही दिली. परंतु, विभागाने कोर्टाच्या निर्णयाला केराची टोपली दाखवून कोणतीच कार्यवाही केली नाही. परिणामतः शिक्षक, कर्मचाऱ्यांनी शासन विरोधात मुंबई उच्च न्यायालयात अवमान याचिका दाखल केल्या आहेत. याच तासिका शिक्षक व रोजंदारी कर्मचाऱ्यांना पुन्हा तात्पुरत्या नियुक्त्या दिलेल्या आहेत.

## कृषीमंत्र्यांच्या विरोधात प्रहार संघटना आक्रमक जिल्हाधिकारी कार्यालयात पत्ते खेळून केला निषेध

विदर्भ प्रजासत्ताक दि. २१ अमरावती : राज्याचे कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांचा विधानभवनात रमी खेळतानाचा व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर चांगलाच गदारोळ सुरू आहे. अमरावतीमध्येही प्रहार संघटनेचे महानगर प्रमुख बंटी रामटेके यांचे नेतृत्वात अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयात पत्ते फेकून आंदोलन करण्यात आले. कृषी मंत्रांचा निषेध करत त्यांचा निषेध करण्यात आला,यावेळी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांच्या पोस्टरला जोडे चपला देखील आंदोलकांनी मारल्या. विधानभवनातून शेतकरी, शेतमजूर, दिव्यांग यांच्या फायद्याचे निर्णय होतील अशी अपेक्षा असताना मंत्री मात्र पत्ते खेळण्यात आणी मारामाऱ्या करण्यात व्यस्त आहेत.अशा मंत्र्यांना बडतर्फ करण्याची मागणी यावेळी आंदोलकांतर्फे करण्यात आली.

## सुनील उभे विरोधात धनगर समाजाची जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या बद्दल फेसबुकवर अश्लील आणि आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या पुणे येथील सुनील गोपाळ उभे याच्या विरोधात आज अमरावतीत सकल धनगर समाजाने तीव्र संताप व्यक्त केला. जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत सुनील उभे याच्यावर अमरावतीत देखील गुन्हा दाखल करण्याची मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली.

या आंदोलनात धनगर समाजाच्या विविध घटकांचा मोठा सहभाग दिसून आला. उपस्थितांनी घोषणा देत उभे याच्या विधानाचा निषेध केला. समाजबांधवांनी स्पष्टपणे सांगितले की, राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्याबद्दल वापरलेली ही अश्लील भाषा केवळ अपमानास्पद नाही, तर महाराष्ट्राच्या सांस्कृतिक मूल्यांना काळिमा फासणारी आहे.

अनेक वक्त्यांनी यावेळी संतप्त प्रतिक्रिया देताना सांगितले की, हे वातावरण दूषित करण्याचे षडयंत्र असून, याआधीही अशा प्रकारची वक्तव्ये शिवाजी महाराज, सावित्रीबाई फुले यांच्याबाबत करण्यात आली होती. आता त्याच पद्धतीने अहिल्यादेवी होळकर यांच्यावरही टिका करण्यात आली आहे. अशा प्रवृत्तीचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.

यावेळी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन देत अमरावतीमध्ये देखील तात्काळ गुन्हा दाखल करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला.

## भूदान अधिनियमाचं वरुडात उल्लंघन; शासकीय यंत्रणा संशयाच्या भोवऱ्यात

### बहादा गावातील प्रकरण उघडकीस; भूदान मंडळाची कारवाईची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२१अमरावती**

भूदान यज्ञासाठी दिलेली जमीन कोणत्याही परिस्थितीत परत देता येत नाही, हे स्पष्ट असतानाही वरुड तालुक्यातील बहादा गावात अधिनियमाच्या विरोधात जमीन मूळ दात्याच्या वारसाच्या नावावर फेरफार करण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणामुळे शासकीय यंत्रणेतील भूमिकेवर गंभीर संशय निर्माण झाला असून, भूदान यज्ञ मंडळाने या प्रकरणात कठोर कारवाईची मागणी केली आहे.

बहादा येथील गुलाबराव इयापुजी पाटील यांनी सर्वे क्र. ६९ मधील २६.१८ हेक्टर जमीन भूदान यज्ञासाठी १९५३ मध्ये दान केली होती. ही जमीन भूदान यज्ञ अधिनियम १९५३ च्या कलम १७ (७) अंतर्गत स्वीकारली गेली असून, त्याचे स्वामित्व मंडळाकडे निहित झाले होते. नंतर ही जमीन मारुती गणू चौधरी (२१.६० हे.) व चिका आलम गोंड (४.५८ हे.) या लाभार्थ्यांना कसण्यासाठी देण्यात आली होती.

मात्र, गुलाबराव पाटील यांचे वारस साहेबराव गुलाबराव पाटील यांनी ग्राहक पंचायतमार्फत मोर्शी



येथील तत्कालीन उपविभागीय अधिकाऱ्यांकडे अर्ज दाखल करून जमिनीचा ताबा मागितला. विशेष म्हणजे, भूदान अधिनियमाच्या कलम १९ नुसार ही जमीन दात्याला परत मिळवण्याचा कोणताही अधिकार नाही, असे स्पष्ट असूनही संबंधित अधिकाऱ्यांनी नियम डावलून गट क्र. २०६ व २०९ वरील लाभार्थ्यांच्या नावे असलेली वहिती रद्द करत फेरफार आदेश काढले.हा आदेश बहादा येथील तत्कालीन तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांनी अमलात आणत, सातबारा उताऱ्यावर साहेबराव गुलाबराव पाटील यांचे नाव लावले. यामुळे मूळ लाभार्थ्यांची नावे हटवून त्यांना अनधिकृतपणे जमिनीपासून दूर करण्यात आले.

या प्रकरणात स्पष्टपणे अधिनियमाच्या तरतुदींचा भंग झाल्यामुळे, भूदान यज्ञ मंडळाने हा फेरफार रद्द करून मूळ सातबारा व वहिती पुनर्संचयित करण्याची, तसेच दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.या प्रकारामुळे शासकीय यंत्रणेची पारदर्शकता व कायद्याची अंमलबजावणी यावर प्रश्नचिन्ह उभे राहिले असून, यापुढे असे प्रकार टाळण्यासाठी शासनाकडून प्रभावी निरीक्षणाची गरज असल्याचे स्थानिकांनी सांगितले आहे.